# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०९/ २०१४** **दिनांक २६.०६.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक २६.०६.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १४५९/ २०१४, दिनांक २५ जुन, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.२६.०६.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०५.०६.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.५२७** दिनांक ०५.०६.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०२** **दिनांक १२.०६.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.५२८** दिनांक १२.०६.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०३** **(अ) नोंद घेण्याचे विषय-**

**०१. जमाखर्च तक्ता माहे मार्च- २०१४.**

माहे, मार्च-२०१४ मधील जमा रु.४३,१०,९५,२१४ आणि खर्च रु.३६,०१,७७,८६९/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे मार्च-२०१४ मधील रु.६,४७,७८६/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३१.०३.२०१४ अखेर रु.१०,९८,५६,८३,१५०/- चा तक्ता, या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२९** **(A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---------------------------------------------------------------------------------------------------------

**०२. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१४ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे फेब्रुवारी व मार्च, २०१४ मध्ये रु.१,३३,५३०/- व रु.१,०९,२२६/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.५२९** **(B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------

**०३. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१४ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे फेब्रुवारी व मार्च, २०१४ मध्ये रुपये ७,३८,२५६/- व रु.७,१९,४१३/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.५२९** **(C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------

**०४. माहे मे, २०१४ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसाद वाटपाची नोंद घेणे.**

माहे मे, २०१४ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना १७,१६,००० पाकिटे व त्यासाठी रु.२,३१,३१,६८०/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२९ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**०५. बांधकाम प्रगती तक्ता.**

बांधकाम प्रगती अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२९ (E) बांधकाम प्रगती अहवालाच्या अ तक्त्यामधील अ.नं.०२, ०३ व ०५ ते १४ चालू असलेल्या कामाची नोंद घेण्यात आली व संबंधीत ठेकेदारांना मुदतवाढ मिळणार नाही, कामे वेळेत पूर्ण करावीत, असे कळविणेत यावे. तसेच खालीलप्रमाणे सुचना करणेत आल्या.**

**अ.नं. १)** शिर्डी येथील बसस्थानक संस्थान निधीतून विकसीत करणेकामी मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा. प्रा.लि, पुणे यांना कार्यादेश देणेत आला होता. त्यांची वाढीव मुदत दि.३१.०१.२०१४ रोजी संपुष्टात आलेली असूनही ठेकेदार यांनी काही किरकोळ कामाव्यतिरिक्त इमारतीचे आर. सी. सी., वीट बांधकाम, आतिल व बाहेरील प्लास्टर काम पूर्ण केले असून, रुममधील व्हेट्रीफाईड टाईल्स्, फ्लोरींग व डॅडोचे काम पूर्ण केले आहे. जनरल टॉयलेटचे फ्लोरींग व डॅडो, व पॅसेज डॅडो, चे काम सुरु आहे. टेरेसचे चायना मोझॅक वॉटरप्रुफींगचे काम सुरु आहे. बसस्थानक इमारतीचे बाहेरील बाजुने ACP Sheet बसविणे, साईट डेव्हलपमेंटचे ट्रेंमीक्स कॉंक्रीट ड्रेनेज लाईन कम्पाउंड भिंत, इ. कामे बाकी आहेत.

**ठेकेदार यांनी वेळेत काम का पुर्ण केले नाही, याची चौकशी करणेत यावी.**

**अ.नं. ४)** मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९८,१९९,२००,२०१ मध्ये लेजर शो उभारणी करणेकामी लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना कार्यादेश देणेत आला होता. सध्या सिव्हील वर्कचे काम बंद असल्याने, लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना दि.०७/०३/२०१३ रोजीचे पत्राने तुर्तास लेजर शोचे काम स्थगित ठेवणेस कळविले आहे. लेजर व्हिजन यांचे Payment ०५ व ०६ आदा करणेस मान्यतेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस्तव ॲड.संजय चौकीदार यांचेमार्फत सिव्हील अर्ज दाखल करणे बाबत कार्यवाही करणेत येत आहे.

**मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी आजपर्यंत काय काम केलेले आहे, त्याचा अहवाल समिती सभेसमोर सादर करणेत यावा.**

**ब- तक्ता (अंतिम बिल)**

**(१)** संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकरीता वर्क स्टेशन फर्निचरचे काम करणेचे ठेकेदार टेक्सार लाईफ स्टाईल फर्निचर प्रा.लि., औरंगाबाद यांनी विहीत मूदतीत काम पूर्ण केले असून सदर कामाचे अंतिम बिल रु.३,८७,५१९/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

**(२)** श्री साईप्रसादालय परिसरातील २५० KVA जनरेटर रुम व पार्किंग शेड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे कामीचे ठेकेदार मे.साई नॅचरल स्टोन, साकुरी यांनी विहीत मूदतीत काम पूर्ण केले असून सदर कामाचे अंतीम बील रु.४,३८,६३६/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

**(३)** नविन स्टाफ क्वार्टर सबस्टेशन परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे कामीचे ठेकेदार मे.साईदिप पेव्हर्स, निमगाव यांनी विहीत मूदतीत काम पूर्ण केले असून सदर कामाचे अंतीम बील रु.१,२७,४६१/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

**(४)** श्री साईनाथ रुग्णालय टॉयलेट ब्लॉकमध्ये कमोड बसविणे कामीचे ठेकेदार श्री.आनंदराव मोतीलाल परदेशी, जवळे, ता.नेवासा यांना सदरहू काम करताना आलेल्या अडचणी लक्षात घेता त्यांना काम पुर्ण करणेसाठी दि.३०/०५/२०१४ अखेर देण्यात आलेली मुदतवाढ मंजुर करणेत येऊन, त्यांचे अंतीम बील रु.१,४५,९६७/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०६. पाणी तपासणी अहवाल माहे मे, २०१४.**

माहे मे, २०१४ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.५२९ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत. (सादरीकरण व चर्चा)**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनार्थ येणारे साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते.

त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल व जुन्या पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसराचा भाग पूर्ण क्षमतेने भरतो. काही प्रसंगी दर्शन रांग त्याबाहेर जाते. त्यासाठी संपूर्ण मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर यांचे एकत्रीकरण, पुर्ननियोजन व पुनर्विकास करण्याचे संस्थानतर्फे ठरविण्यात आले आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे अहमदनगर येथील सभेत आर्किटेक्ट माथूर अँण्ड काप्रे असो., नवी दिल्ली, यांना त्यांनी बनविलेल्या दर्शन रांग व मंदिर परिसर पूर्नविकास प्रकल्पाचे संकल्पनात्मक आराखडयांचे सादरीकरण करणेसाठी सभेपुढे पाचारण करणेत यावे अशी सूचना करण्यात आली.

मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विषयांकीत प्रकल्पाचे संकल्पनात्मक आराखडे सादर करणेबाबत आर्किटेक्ट यांना इकडील जा.क्र.४८९५/२०१४, दि.२३/०१/२०१४ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेपुढे सुधारीत आराखड्यांचे सादरीकरण केले. त्यावर खालील प्रमाणे निर्णय क्रमांक ८३ संमत करण्यात आलेला आहे.

*"......आर्किटेक्ट माथूर अॅण्ड काप्रे तसेच यापुर्वी इतर आर्किटेक्ट संस्थांनी सादर केलेल्या आराखडा वजा प्रस्तावाबाबत साधक बाधक चर्चा झाली. आर्किटेक्ट माथूर अॅण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांनी सादर केलेले संकल्पनात्मक आराखडे वजा प्रस्ताव, दर्शन रांगेकरीता आवश्यक असलेल्या जादा क्षमतेची प्रतिक्षागृहे, सुरक्षा तपासणी, आगप्रतिबंधक व्यवस्था, मोबाईल, चप्पल, लॉकर्स, आसन व्यवस्था, भक्तांना देणेत यावयाच्या विविध सोयी-सुविधांचा समावेश, वायुवीजनासाठी केलेली तरतूद, प्रकल्पातील भव्यता इत्यादी अधिकाधीक आवश्यकता पूर्ण करणारे व सुयोग्य असल्याने तसेच श्री. काप्रे यांनी यापुर्वी मंदिर परिसराचा अभ्यासपूर्वक आराखडा तयार करुन त्याची यशस्वीरित्या उभारणी केलेली आहे. याचा वस्तुनिष्ठ व साकल्याने विचार करुन, त्यांची सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. तसेच यापुर्वी समाधी मंदिर व जुने प्रसादालय परिसर नुतनीकरण करणेसाठी इतर आर्किटेक्ट संस्थानी तयार केलेले संकल्पनात्मक आराखडे व प्रस्ताव नाकारण्यात आले.*

*याकामी आर्किटेक्ट यांनी या प्रकल्पासाठी ढोबळमानाने रक्कम रुपये २४४.६६ कोटी मात्रचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. तथापि, समाधी मंदिर परिसर व जुने प्रसादालय नुतनीकरणासाठी संकेत स्थळावर ठेवणेत येणाऱ्या संकल्पनात्मक आराखडयांवर साईभक्तांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर त्यापैकी योग्य व उचित बाबींचा विचार व समावेश करुन सुधारित नकाशे, अंदाजपत्रक व आर्किटेक्ट शुल्काबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्ताव तयार करुन घेऊन, तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले."*

उपरोक्त प्रमाणे झालेल्या निर्णयानुसार दिनांक १६/०३/२०१४ रोजी दैनिक पुढारी, दै.डी.एन. ए. बैंगलोर, दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद, तरुण भारत, नागपूर, व इतर या वर्तमानपत्रांमध्ये निवेदन प्रसिध्द करणेत आले होते. या प्रकल्पाबाबत ४५ साईभक्तांनी त्यांचे अभिप्राय संस्थानचे संकेतस्थळावर नोंदविले आहेत. सदरहू अभिप्रायांमध्ये प्रामुख्याने खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

०१. दर्शन रांगेमध्ये HVAC ची सुविधा करण्यात यावी.
०२. अपंग, वयोवृध्द व लहान मुले यांना दर्शनासाठी स्वतंत्र रांग असावी. ज्यामुळे कमीत कमी अंतर चालून साईंचे दर्शन सुलभतेने घेता येईल.
०३. साईभक्तांना दर्शन रांग इमारतीपर्यन्त सहजतेने पोहचणेसाठी नगर-मनमाड राज्य महामार्गावर स्कायवॉक तयार करणेत यावा.
०४. मंदीर परीसरात दर्शन झालेनंतर साईभक्त काही वेळेसाठी विश्रामासाठी बसतात ही सुविधा बंद करणेत येऊ नये.
०५. फायरसेफ्टी, आपत्कालीन गेट, स्वयंचलित जिना (Escalator) याबाबत सुविधांचा विचार करण्यात यावा.
०६. समाधी मंदिराची भौतिक क्षमता लक्षात घेऊन तिरुमाला तिरुपती देवस्थानप्रमाणे एका दिवसात जास्तीत जास्त किती भक्तांनी दर्शन घ्यावे याबाबत नियोजन करावे.
०७. दर्शन रांग इमारतीमध्ये साईभक्तांकरीता स्वच्छतागृहे व उपहारगृहे यांची सुविधा पुरविणेत यावी.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले अभिप्राय आर्किटेक्ट माथुर अॅण्ड काप्रे, नवी दिल्ली यांचेकडे पाठविणेत आले आहेत. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी नियोजित प्रकल्पाचे कामात उपरोक्त बाबींचा समावेश करुन अंदाजे रु.३४०.२० कोटी मात्रचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर केले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | Building Civil Works | 1,68,31,68,658.00 |
| 02 | Building Services | 38,82,19,768.00 |
| 03 | HVAC | 61,37,94,188.00 |
| 04 | Electrical Equipment & Machinery | 34,41,99,281.00 |
| 05 | Public Health Equipment & Machinery | 11,82,10,305.00 |

| | | |
|---|---|---|
| 06 | Road Works | 36,25,000.00 |
| 07 | Landscaping Works | 90,65,000.00 |
| | Total - | 3,16,02,82,200.00 |
| | Add Cost Index Difference Between Delhi & Nashik 7.65% | 24,17,61,589.00 |
| | **Total Estimated Cost of the Project-** | **3,40,20,43,789.00** |

मे. माथुर ॲण्ड असो. नवी दिल्ली यांनी दि.०७/०४/२०१४ रोजीचे पत्राद्वारे असे कळविले आहे की, संस्थान बरोबर यापुर्वी दि.०९/११/१९९७ रोजी मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून कामकाजाबाबत त्यांनी केलेल्या करारनाम्यातील शर्त क्र.३, ४ व ५ अन्वये विषयांकीत प्रकल्पासाठी काम करण्याची त्यांची तयारी आहे. त्यासाठी त्यांनी सदर कामाचे नेमणूक पत्र त्यांना देण्यात यावे व करारनामा करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

तसेच मे. माथुर ॲण्ड काप्रे यांनी असेही नमुद केले आहे की, सदर प्रकल्पाची निविदा प्रपत्रे तयार करणेचे काम त्यांचे मार्फत सुरु असून लवकरच निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करता येईल. दरम्यान सिव्हील कॉन्ट्रक्टर्ससाठी पुर्व पात्रता प्रक्रिया लगेचच सुरु करता येईल म्हणजे चांगल्या दर्जाची कॉन्ट्रक्टरची निवड करता येईल. असे आर्किटेक्ट यांनी वरील दि.०७/०४/२०१४ रोजीचे पत्रात म्हटले आहे. वरील विषयांकीत प्रकल्प हा साईभक्तांचे सोयीचे दृष्टीने अंत्यत महत्वाचा असून, संस्थानचे आजपर्यंतचे इतिहासातील सर्वात मोठया खर्चाचा प्रकल्प आहे. आर्किटेक्ट यांनी वरील प्रमाणे दिलेल्या प्राथमिक अंदाजपत्रकानुसार या प्रकल्पासाठी अंदाजे रु.३४०.२० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी सविस्तर एस्टीमेंट तयार झालेनंतर अंदाजे खर्चाचे रकमेत बदल होऊ शकतो.

वरील विषयांकीत प्रकल्पाबाबत खालील बाबींविषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

०१) मे.माथुर ॲण्ड काप्रे असो. प्रा. लि. नवी दिल्ली यांची सदर प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या किंमतीचे ३.५% इतक्या फी वर व पुर्वीच्याच (दि.०९/११/१९९७ चे करारनाम्यानुसार) अटी- शर्तीवर नेमणूक करणे.

०२) प्रकल्पाकरीता प्राथमिक एस्टीमेंटनुसार अपेक्षित असलेल्या रु.३४०.२० कोटी मात्र इतक्या खर्चास मान्यता देणे.

०३) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. नं.१८/२०११ मधिल सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरहू प्रकल्प हा मोठया खर्चाचा असल्याने त्यासाठी प्रथम मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे.

तरी वरील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३०** आजचे सभेपुढे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कार्प्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री.उदय काप्रे यांनी श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्प नकाशांचे सादरीकरण करुन प्रकल्पाबाबत खालिलप्रमाणे माहिती दिली.

नियोजित दर्शन रांग इमारत व मंदिर परिसराचा पुर्नविकास करतांना दर्शन रांगेचा हॉल, भव्य अशा उंचीचे छत व प्रशस्त प्रतिक्षालय, भव्य प्रवेशद्वार जेथे सर्व साईभक्त दर्शनासाठी एकत्र जमतील, अशा पध्दतीने नियोजन बद्ध स्वरुपात विकसित करण्यात येणार आहे.

- समाधी मंदिरालगत असलेल्या जुने प्रसादालयाच्या प्लॉटवरील सध्याच्या सर्व इमारती काढून त्या ठिकाणी भव्य अशी नियोजित दर्शन रांग इमारत करण्यात येणार आहे. या इमारतीमध्ये एकाच वेळी ३०,००० साईभक्तांची क्षमता असेल.
- इमारतीचे तळमजल्यावर साईभक्तांसाठी तीन मुख्य प्रवेश हॉल तयार करण्यात येणार असून, त्यामध्ये साईभक्तांना मोबाईल व चप्पल ठेवण्यासाठी लॉकर, शौचालय, माहिती केंद्र व दर्शन रांगेत जाण्याआधी सुरक्षा तपासणी करण्यात येणार आहे.
- इमारतीचे तळमजल्यावरील अर्ध्या भागात Exit Plaza तयार करण्यात येणार असून, त्यामध्ये साईभक्तांना मोबाईल व चप्पल लॉकरमधून परत घेणेची सुविधा करण्यात येणार आहे. तसेच सदर भागात लाडू विक्री काऊंटर, उदी वाटप, देणगी, ए.टी.एम. सुविधा, पुस्तक विक्री केंद्र व कापड कोठी इत्यादी सुविधा पुरविण्यात येणार आहे.
- साईभक्तांना दर्शन रांगेत जाण्याअगोदर इमारतीचे महिल्या व दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी २,५०० साईभक्त सामावू शकतील असे सहा हॉल प्रत्येक मजल्यावर असतील.
- सदर हॉलमध्ये साईभक्तांकरिता शौचालय, चहा व नाष्टयाची सुविधा, प्रथमोपचार केंद्र व बेबी फिडींग रुम इत्यादीची सुविधा पुरविण्यात येतील.
- पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या मॅझानाईनवर दर्शन रांगेची पहाणी करण्यासाठी सुरक्षा काऊंटरची व्यवस्था व दर्शन रांगेकरिता आवश्यक इतर कार्यालये करण्यात येणार आहेत.

- सदर इमारतीचे तळघरात देखभाल दुरुस्ती विभाग, विद्युत सबस्टेशन, पाण्याची टाकी, ॲम्बुलन्स व कर्मचारी पार्किंग सुविधा इत्यादी विभाग असतील.
- दर्शन रांग इमारतीचे पहिल्या मजल्यावरुन स्कायवॉक द्वारे साईभक्त थेट समाधी मंदिरात येतील, जेणेकरुन मनोज कुमार गोस्वामी पथ या मार्गावरील वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही.
- समाधी मंदिराकडे जाणाऱ्या स्कायवॉकमध्ये सहा रांगा असून, त्यापैकी एका रांगेतुन अपंग, व्ही.आय.पी. व गावकरी यांना दर्शनासाठी जाण्याची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच संरक्षण विभागाचे कर्मचाऱ्यांना दर्शन रांगेत नियंत्रण ठेवणेसाठी व आपत्कालीन व्यवस्थेसाठी एक रांग मोकळी सोडण्यात येणार आहे. उर्वरीत दर्शन रांगांमध्ये साईभक्त दर्शनासाठी जाऊ शकतील अशी व्यवस्था केली जाणार आहे.
- सध्या भक्तनिवास इमारतीमधून मुख्य मदिरात प्रवेश करण्यासाठी ज्या प्रकारे भुयारी मार्ग करण्यात आलेला आहे, तशाच प्रकारची व्यवस्था नियोजित प्रकल्पात करण्यात येणार आहे. परंतू नियोजित प्रकल्पात सदरचे भुयारी मार्गातुन जातांना साईभक्तांना त्रास होऊ नये याकरिता नैसर्गिक प्रकाश व वायुविजनसह भुयारी मार्ग प्रशस्त स्वरुपात करण्यात येईल.
- समाधी मंदिरातुन बाहेर पडल्यानंतर सध्या मंदिर परिसरात असलेल्या सुविधांचा लाभ घेऊन, परततांना सध्याचे जनसंपर्क कार्यालया जवळून भुयारी मार्गाने जुने प्रसादालय परिसरात प्रवेश करतील.
- नियोजित प्रकल्पात समाधी मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास हया इमारती पाडण्यात येऊन त्या ठिकाणाहून स्कायवॉकद्वारे समाधी मंदिराकडे साईभक्तांना पोहोचण्यासाठी मार्ग तयार करण्यात येणार आहे. सदर स्कायवॉक खालील भागात मंदिर परिसरात आवश्यक असणारी कार्यालये असणार आहेत.
- श्रींचे द्वारकामाईचे व मुख दर्शन घेणेकरिता साईभक्तांची दर्शन रांगेची व्यवस्था सध्याचे भक्तनिवास इमारतीचे ठिकाणाहून जाणाऱ्या वॉक- वे (दर्शन रांग) तळमजल्यावरुन करण्यात येणार आहे.

**सध्या कमी पडत असलेली दर्शन रांगेची सुविधा व दि.०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षास सुरुवात होणार असल्याने तत्पुर्वी भक्तांना दर्शन रांगेची सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०५ मौजे निमगाव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील संस्थानचे गट नंबर १८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेकामी आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांचे सादरीकरणाबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतुद आहे.

**<u>प्रस्तावना:-</u>** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे खालीलप्रमाणे शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.

१. श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कुल, शिर्डी
२. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी
३. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी
४. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी

वरीलपैकी इंग्लिश मेडीयम, कन्या विद्या मंदिर व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या इमारती शिर्डी सर्व्हे नंबर १०८, १०९ मधिल संस्थान मालकीचे जागेत आहेत. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाला कायमस्वरुपी इमारत उपलब्ध नसल्याने त्यांचे वर्ग सध्या मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर १७२ मधील साईआश्रम भाग-२ चे एका इमारतीत भरविण्यात येत आहेत. तसेच सध्याचे शैक्षणिक संकुलातही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे वर्गांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे इंग्लिश मेडीयम स्कुलचे वर्ग दोन सत्रात भरवावे लागत आहेत. या बाबींचा विचार करुन संस्थान संचलीत सर्व शैक्षणिक संस्थांकरिता एकाच ठिकाणी कायम स्वरुपी असे अद्ययावत शैक्षणिक संकुल उभारणेसाठी प्रस्ताव सादर करावा अशी सुचना मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या होत्या. तसेच याकरिता जागा निश्चित करणेसाठी मा.अध्यक्ष, मा.सदस्य- तथा- जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी

अधिकारी यांनी निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर १८३ मधील जागा नियोजित शैक्षणिक संकुलासाठी निश्चित करणेत यावी असे ठरले आहे.

**प्रस्तावः-** मौजे निमगांव को-हाळे, ता. राहाता येथील संस्थान मालकीचे गट नंबर १८३ मधील जागेचे क्षेत्र ५ हेक्टर ४० आर इतके आहे. या जागेत संस्थानच्या वरील सर्व शैक्षणिक संस्थांकरिता वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडांगण, वाहनतळ इत्यादी पायाभूत सोयी- सुविधा उभारता येतील.

त्यासाठी प्रथम सदर संस्थांच्या भविष्यातील गरजा विचारात घेऊन त्यानुसार नियोजित सुविधांचे स्वरुप ठरवावे लागेल. त्याकरिता सदर नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करणेसाठी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरिता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेत याबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.९४१ अन्वये सदरहू कामी या क्षेत्रातील नामांकीत व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावे असे ठरले.

त्यानुसार आर्किटेक्ट डी. ओ. निकम यांचेकडून दि.१४/०१/२०१४ रोजीचे टिपणी द्वारे प्राथमिक नकाशे व ढोबळ अंदाजपत्रक घेणेस मान्यता देणेत आली आहे. याकामी आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांना संस्थान जा. क्र.५३५८/२०१४ दि.२४/०२/२०१४ अन्वये विषयांकीत प्रकल्पासाठी प्राथमिक नकाशे तयार करुन, सदर प्रकल्पासाठी त्यांचे फीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

याबाबत दिनांक ०१/०३/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षते खाली व आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांचे उपस्थितीत मौजे निमगांव को-हाळे, ता.राहाता येथील संस्थानचे गट नंबर १८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणे बाबत बैठक आयोजित केली होती. त्यावेळी चारही शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांनी नियोजित प्रकल्पाबाबत त्यांच्या गरजांविषयी मत मांडले. त्यानुसार आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांनी सदरहू प्रकल्पासाठी प्राथमिक संकल्पन आराखडे तयार केले असून त्याचे सादरीकरण ते मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे करणार आहेत.

तरी संस्थानचे मौजे निमगांव- को-हाळे, ता. राहाता येथील गट नं. १८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेकामी आर्किटेक्ट, डी. ओ. निकम, पुणे यांनी तयार केलेल्या प्राथमिक संकल्पन आराखडयांचे सादरीकरण पाहणेस व सदर प्रकल्पासाठी त्यांना अदा करावयाचे फी ठरविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३१** आजचे सभेपूढे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांनी संस्थानचे मौजे निमगाव- को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये उभारावयाच्या नियोजित शैक्षणिक संकुल इमारतीच्या संकल्पनात्मक नकाशांचे सादरीकरण केले. त्यावेळी त्यांनी प्रामुख्याने खालील बाबी नमुद केल्या.

- संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मेडिअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडून प्राथमिक माहिती घेऊन, तसेच सदर संस्थांच्या भविष्यातील गरजा विचारात घेऊन त्यानुसार नियोजित शैक्षणिक संकुल परिसराचे आराखडे तयार करणेत आलेले आहेत.
- संस्थानचे मौजे निमगांव- को-हाळे येथील गट नं. १८३ मधील ५ हेक्टर ४० आर इतके क्षेत्रात वरीलपैकी श्री साईबाबा इग्लिश मेडिअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, यांचे करिता नियोजित शैक्षणिक संकुल उभारणेत येईल.
- यामध्ये वर्ग खोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडांगण व वाहन तळ इ. पायाभूत सुविधा गृहीत धरण्यात आलेल्या आहेत.
- श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था १० एकर जागेत स्थलांतरीत करावी, असे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून कळविणेत आले असल्याने त्यांचे करिता स्वतंत्र क्षेत्रामध्ये इमारत व परिसर विकास करता येईल.
- संस्थानचे गट नं.१८३ मधील एकूण ५ हेक्टर ४० आर क्षेत्रापैकी नगर रचना विभागाचे नियमानुसार ४० टक्के Play Ground Area सोडून उर्वरीत जागेत इमारती प्रस्तावीत करण्यात आलेल्या आहेत.
- श्री साईबाबा इग्लिश मेडिअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे करीता तीन सुसज्ज अशा स्वतंत्र इमारती प्रस्तावीत केलेल्या असून इमारतींमध्ये नैसर्गिक प्रकाश व वायू व्हिजनची व्यवस्था असेल. त्यामध्ये संबंधीत शाळांचे आवश्यकतेनुसार वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, प्राचार्य कक्ष, स्टाफ रुम कार्यालय, Sick Room, Drawing Hall, Computer Lab तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

- प्रत्येक इमारतीच्या तळघरात पार्कीगची सुविधा करण्यात आलेली आहे. यामध्ये एकूण ७८ कार, २३२ दोन चाकी, तसेच १८०० सायकल पार्कीगची सुविधा असेल.
- बसद्वारे येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र प्रवेशद्वार व बाहेर पडण्याचा मार्ग ठेवण्यात आलेला आहे. एकूण १८ बस पार्कीग व्यवस्था करण्यात येईल.
- श्री साईबाबा इग्लिश मेडिअम शाळेतील के.जी. च्या मुलांकरिता वर्ग खोल्यांना जोडूनच शौचालयाची व्यवस्था ठेवण्यात येईल.
- प्रत्येक इमारतीकरिता भव्य Entrance Lobby व मध्यवर्ती जिना असेल. तसेच आपत्तीकालीन वेळेस फायर सेफ्टीकरिता दोन स्वतंत्र जिन्यांची सुविधा असेल.
- शैक्षणिक संकुलाकरिता आकर्षक अशी स्वतंत्र जिमखाना इमारत प्रस्तावीत करण्यात आली आहे. सदर इमारतीत कव्हर्ड बॅडमिन्टन हॉल, तसेच २५० विद्यार्थी क्षमता व सलग्न शौचालय व ग्रिन रुम असलेले ऑडीटोरिअम व सेमी ऑलम्पीक साईजचा कव्हर्ड स्विमिंग पुल इत्यादीची सुविधा असेल.
- जिमखाना इमारतीत टेबल टेनिस, जिमनॅशिअम, चेस, कॅरम व पुल रुम इत्यादीची सुविधा करणेत येईल.
- इमारतीच्या बाहेरील बाजुस फुट बॉल, हॉकी, बास्केट बॉल, खो-खो व कबड्डी इत्यादीकरीता मैदाने तयार करणेत येतील.
- नियोजित शैक्षणिक संकुल इमारतींमध्ये कुठेही Cantiliver Design नाही.

उपरोक्त सादरीकरणावर सांगोपांग चर्चा होऊन मा.समिती सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत.

१. नियोजित इमारतींमध्ये प्रत्येक मजल्याच्या दोन्ही बाजूस विद्यार्थी व विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी.
२. इमारतींवर सोलर पॅनल बसवून शैक्षणिक संकुलाला आवश्यक वीज निर्मीती करण्यात यावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०६** **कॅज्युलिटी विभागामध्ये ॲल्युमिनीअम पार्टीशन करुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाचे कलम -२१ (१) मधील पोटकलम (क)अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे". अशी तरतूद आहे.

**प्रस्तवनाः-** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल मधील कॅज्युअल्टी विभागामध्ये ईमरजन्सी आर.टी.ए. तसेच ओ.पी.पी पेशंट येत असतात. त्यापेशंट करीता ड्रसिंग रुम मध्ये पार्टीशन बसवून दिल्यास पेशंटचे उपचारास सोयीस्कर होईल असे वैद्यकीय संचालक यांनी दि.१०/०३/२०१४ रोजीचे डी.पी. पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्तावः-** याकामी इकडील विभागामार्फत पाहणी केली असता सदर ठिकाणी ॲल्यु. पार्टीशन तयार करणेसाठी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | **Alluminium Partition work :-** Providing supplying and fixing in position powder coated extruded aluminium partition, partly glazed and partly laminated having frame made out of extruded tubular section of size 65mm x 40mm (2.5"x1.5") with 12 mm thick three layered flat pressed teak wood particle board bonded with BWP type exterior grade phenolformaldehyde synthetic resin conforming to IS 12823-19890, Laminated on both sides, Novateak or equivalent and 5mm thick selected quality float glass panels fixed with aluminium glass clips 12mm x12mm and rubber cushioning beading to glass partition etc. complete. | 10.60 | Sqm | 2251.00 | 23860.60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **Alluminium Section– Jindal Glass- Saint Gobain, Modi Float.** | | | | |
| 02 | **Alluminium Door Work :-** Providing and fixing in position **single shuttered extruded powder** coated **door** of overall size 2.10m X 0.9m or as specified with alluminium door frame of powder coated section and shutter **comprising of powder coated section** having **bottom and lock rail** of size 150mm x 44.45mm, 2.90 mm thick, top rails 47.62 X 44.45 mm, 3.18 mm thick vertical styles 47.62 x 44.45 mm, 3.00mm thick with 5mm thk.and selected quality float glass panels fixed with alluminium glass clips 12 mm x12mm and rebber cushioning beading to glass, with heavy duty ISI mark door closer, heavy duty concealed lock, handles, necessary glazing clips, poly vinyl chloride gaskets, tower bolts etc. complete. Glass – Saint Gobain, Modi Float. Lock- ISI Make, Door closer- Godrej. | 1.951 | Sqm | 5931.00 | 11,571.38 |
| | | **Total Amount** | | | **35,431.98** |
| | | | | **Say R/o Rs.** | **35,432/-** |

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** उपरोक्त तपशिलाप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल कॅज्युअल्टी विभागातील अल्युमिनीअम पार्टीशन करीता रु.३५,४३२/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे रु.३५,४३६/- मात्रचे खर्चास व सदर काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलकडील कॅज्युअल्टी विभागामध्ये अल्युमिनीअम पार्टीशन करणेकरीता काम विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.३५,४३२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) चे तिसऱ्या टप्प्यातील २०० खोल्यांसह संपुर्ण इमारतीचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविकः** संस्थानमार्फत साईभक्तांचे निवासासाठी सन १९९४-९५ मध्ये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारत उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सन १९९९-२००० मध्ये सदर इमारतीचे खोल्यांमधील टॉयलेट दुरुस्तीचे काम करुन घेणेत आले आहे. तसेच या इमारतीस सन २००३-०४ मध्ये आतिल बाजूने रंगकाम करणेत आले आहे. सध्या सदरहू इमारत साईभक्तांना निवासासाठी अत्यंत उपयुक्त व सोयीची असल्याने या ठिकाणी खोल्या नेहमीच पूर्ण क्षमतेने वापरात असतात.

सदरहु इमारतीमधील ५०० खोल्यांपैकी १०० खोल्यांचे दुरुस्तीचे काम विभागामार्फत करणेत आलेले आहे. तसेच पहिल्या टप्प्यामध्ये १०० खोल्यांचे नुतनिकरणाचे काम पूर्ण करणेत आले असून, दुसऱ्या टप्प्यातील २०० खोल्यांचे कामासाठी मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७४५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनिकरण करणेचे कामासाठी आर्किटेक्ट डहाणुकर असोशिएटस्, मुंबई यांनी सेवा देणेची तयारी दर्शविलेली असल्याने, त्यांची या कामी नियुक्ती करुन, त्यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक, निविदा फॉर्म व बिले प्रमाणीत करुन घेणेस तसेच सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.४,१०,३२,६४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

सदरचे नुतनीकरणाचे खर्चास मा.मुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची परवानगी मिळणेकामी प्रस्ताव संस्थान वकीलामार्फत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. याबाबत संस्थानचे वकील यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**प्रस्ताव:** मा.उप कार्यकारी अधिकारी यांनी दि.०४/०४/२०१४ रोजी साईबाबा भक्तनिवास येथे प्रशासकीय अधिकारी व इतर विभागप्रमुख यांचेसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानुसार याबाबत दि.०९/०४/२०१४ रोजी परीपत्रक काढून संबंधित विभागांना त्यावर योग्य कार्यवाही करणेचे सुचना देण्यात आल्या. तसेच मा. अधिक्षक साईबाबा भक्तनिवास यांनी दि.१७/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये देखील सदरचे दुरुस्ती करणेबाबत कळविले आहे. सदर परीपत्रकातील अ.नं.५ व १० बाबत खालीलप्रमाणे निर्देश / सुचना कळविल्या आहेत.

| परीपत्रक अ. नं. | सुचना/निर्देश |
|---|---|
| ०५ | संपुर्ण बिल्डींगच्या कलरचे पोपडे निघालेले आहेत. ठिकठिकाणी भिंतींना ओलावा आला आहे. तरी संपुर्ण बिल्डींग बाहेरून व आतून कलर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा. व ओलावा कशामुळे आला ते पाहून त्यावर उपाययोजना कराव्यात. |
| १० | साईबाबा भक्त निवासस्थान इमारतीत असणारे हॉल्स टॉयलेट बाथरुम अॅटॅच करणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा तसेच बरेच टॉयलेट बाथरुमचे दरवाजे खराब झालेले आहेत. खिडक्यांच्या काचा फुटल्यामुळे प्लायवुड बसविलेले आहे. त्यामुळे विचित्र दिसत आहे.तरी खिडक्या स्लायडिंग करणे तसेच टॉयलेट बाथरुमचे दरवाजे बदलुन घेणेबाबत प्रस्ताव त्वरीत सादर करावा. |

उपरोक्त नमुद कामे मोठया स्वरूपाची असल्याने हि कामे तिसऱ्या टप्यातील २०० रुमच्या नव्या प्रस्तावात सादर करणे योग्य राहील असे मत आहे. साईबाबा भक्तनिवास येथील जादा खराब रूमचे रंगकाम इकडील विभागामार्फत करुन घेण्यात येत आहे. भक्तनिवासमधील उर्वरीत रुमची पाहणी करण्यात आली असुन सदर खोल्यांचे नुतनिकरणासाठी खालील कामांचा समावेश करता येईल.

१. टॉयलेटमधील संडास भांडे बदलणे,
२. खोल्यांमधील सध्याचे कोटा ऐवजी नवीन फ्लोरींग व डॅडो बसविणे.
३. पाईपलाईन्स बदलणे व कन्सील्ड करणे,
४. खोल्यांचे आतिल बाहेरील बाजूने रंगकाम करणे.
५. दरवाजे बदलणे.
६. जनरल संडास-बाथरुमचे नुतनिकरण करणे.
७. इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणे.
८. हॉल अॅटेच करणे.
९. अॅल्यूमिनियम स्लायडींग विंडो बसविणे.
१०. सोलर वॉटर हिटींग सिस्टीम बसविणे.
११. खोल्या वातानुकुलीत करणे.
१२. सिवरेज ट्रीटमेंट प्लॅन्ट बसविणे व शुद्धीकरण केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणेकामी आवश्यक व्यवस्था इ. कामे करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कामे करणेसाठी इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसूचीनुसार करणेकामी ढोबळमानाने अंदाजे रुपये ११.४० कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता वरील प्रमाणे तिसऱ्या टप्प्यामध्ये उर्वरीत २०० खोल्या नुतनीकरण व वर नमूद केलेनुसारची कामे ही मोठ्या स्वरुपाची असल्याने, सदरहू कामासाठी बांधकाम वास्तू विशारदाची नेमणूक करुन त्यांचेकडून सदर कामांचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय:** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत साईभक्तांना निवासासाठी अत्यंत उपयुक्त व सोयीची असल्याने या ठिकाणी खोल्या नेहमीच पूर्ण क्षमतेने भरलेल्या/ वापरात असतात. करीता तिसऱ्या टप्यातील उर्वरीत २०० खोल्यांचे नुतनिकरण व वर नमूद केलेली कामे करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी वास्तू विशारदाची नमेणूक करुन त्यांचेकडून सविस्तर आराखडे व अदाजपत्रके तयार करुन समितीचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करता येईल. त्यानंतर सदरहू खर्चास मान्यता मिळणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी मिळणेसाठी अर्ज सादर करता येईल. तरी वास्तूविशारद यांची नेमणूक करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील २०० खोल्यांच्या नुतनीकरणासाठी समितीने मान्यता दिलेली आहे व त्याकामी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून आजतागायत मा.खंडपीठाची सदरहू खर्चास मंजुरी मिळालेली नाही. यामुळे पुर्वीच्या २०० खोल्यांच्या नतुनीकरणासाठी येणाऱ्या खर्चास मा.खंडपीठाची मंजुरी येईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ समाधी मंदिरातील समाधी चौथऱ्याचे शेजारील दोन्ही दरवाजे दुरुस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे पाठीमागील भिंतीस व समाधी चौथऱ्याचे दक्षिण व उत्तर बाजूस असलेले दरवाजे दैनंदिन वापरामुळे नादुरुस्त झालेले असल्याने सदरचे दरवाजे दुरुस्त करणेकामी तसेच दोन्ही दरवाजे मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने चौकटीसह व झडपांसह नविन सागवानी लाकडामध्ये तयार करुन बसविणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

समाधी मंदिरात श्री साईचे दर्शन घेतल्यानंतर भक्त समाधी चाथऱ्यालगतचे पश्चिम बाजूकडील दक्षिण व उत्तर दरवाज्यामधून बाहेर पडतात. सदरहू दरवाज्यांचे फ्रेमची उभी लाकडे उंबऱ्यातील कुसामध्ये खराब झालेले असल्याने हलतात. सध्या इकडील विभागामार्फत सदरहू दरवाज्यांचे फ्रेमची दुरुस्ती केलेली आहे. तथापी सदरहू दोन्ही दरवाजे अतिशय जुने झालेले असल्याने ते काढून नवीन दरवाजे तयार करुन बसविणे गरजेचे आहे.

समाधी मंदिरातील सदरचे दरवाजे तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.१- <u>सागवान लाकडाचे शटरसह दरवाजे बसविणे.</u>**

**अ) मटेरिअल खर्च-**

| अ.नं. | मटेरिअलचा तपशिल | परिणाम | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सागवान लाकडामध्ये दरवाज्या फ्रेम बनविणे.<br>फ्रेम साईज- २x२x६" x३" x६'-७<br>२x२x६" x३" x५' | ३.२९<br>२.५०<br>५.७९ | घनफुट | ५५०० | ३१८४५/- |
| ०२ | सागवान लाकडामध्ये दरवाज्याचे शटर तयार करणे<br>पॅनल शटर फळयांचे साईज-<br>२x४x१'-१" x१/२"x६' | ६.५० | घनफुट | ५५०० | ३५७५०/- |
| | | | | | ६७,५९५/- |
| | | | | अधिक ५% कन्टेनजन्सीज - | ३,३८०.०० |
| | | | | एकूण - | ७०,९७५.०० |

**ब) मजुरी खर्च-**

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिणाम | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विभागाकडील कारागीरामार्फत फ्रेम व शटर तयार करणे.<br>सुतार ज २ आठ दिवस<br>मदतनीस २ आठ दिवस. | <br>१६<br>१६ | <br>दिवस<br>दिवस | <br>४३७/-<br>४३७/- | <br>६९९२/-<br>६९९२/- |
| | | | | **एकूण -** | **१३,९८४/-** |
| | | | | **एकूण खर्च (अ +ब) रक्कम रु** | **८४,९५९/-** |
| | | | | **पूर्णाकींत -** | **८५,०००/-** |

**पर्याय क्र.२-** सागवान लाकडाचे दरवाजे फ्रेम बसविणे.

**अ) मटेरिअल खर्च-**

| अ.नं. | मटेरिअलचा तपशिल | परिणाम | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सागवान लाकडामध्ये दरवाज्या फ्रेम बनविणे.<br>फ्रेम साईज- २x२x६"x३"x६'-७<br>२x२x६" x३" x५' | ३.२९<br>२.५०<br>५.७९ | घनफुट | ५५०० | ३१८४५/- |
| | | | | अधिक ५% कन्टेनजन्सीज - | १,५९२/- |
| | | | | एकूण - | **३३,४३७/-** |

**ब) मजुरी खर्च-**

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिणाम | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विभागाकडील कारागीरामार्फत फ्रेम व शटर तयार करणे.<br>सुतार- २ आठ दिवस<br>मदतनीस २ आठ दिवस. | <br>०८<br>०८ | <br>दिवस<br>दिवस | <br>४३७/-<br>४३७/- | <br>३,४९६/-<br>३,४९६/- |
| | | | | **एकूण -** | **६,९९२/-** |
| | | | | **एकूण खर्च (अ +ब) रक्कम रु** | **४०,४२९/-** |

उपरोक्त प्रमाणे समाधी मंदिरातील श्री साईचे मूर्तीचे पाठीमागील भिंतीचे दरवाजे शटरसह नुतनीकरण करणेकामी पर्याय क्र.१ अन्वये रक्कम रु.८५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच पर्याय क्र. २ अन्वये फक्त दरवाजे बसविणेकामी रु.४०,४२९/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सद्यस्थितीत सदरहू दरवाज्याचे शटर सुस्थीतीत असून, ते बदलण्याची आवश्यकता नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे समाधी मंदिरातील श्रींचे समाधी चौथऱ्यालगतचे दरवाज्यांची दुरुस्ती करणेकामी वरीलपैकी एका पर्यायानुसार काम करणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.५३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील समाधी चौथऱ्याचे शेजारील दोन्ही दरवाजे दुरुस्त करणेकामी प्रस्तावातील पर्याय क्र.०२ अन्वये कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या रु.४०,४२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ काथा बाथमॅट/ हिरवे बाथमॅट (पायपुसणे) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८/०७/२०१३ पासुन नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. साई धर्मशाळा या विभागात एकुण ६ इमारती मिळुण १९२ हॉल आहे. त्यापैकी एक इमारमीमध्ये श्री साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे. उर्वरीत पाच इमारतीमध्ये साई भक्तांची तसेच पालखी, पदयात्री, सहलीमधील सहभागी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

साई धर्मशाळेत निवासासाठी येणा-या साईभक्तांना हॉल दिल्यानंतर ते बाजुला असलेल्या बाथरुमला जातांना व बाथरूममधुन बाहेर आलेवर हॉलमध्ये जातांना पाय ओले असतात. ओले पाय पुसण्यासाठी प्रत्येक पॅसेजचे मध्यभागी एक मोठी ५ X ३ या साईजची काथाबाथमॅट ठेवलेतर सर्व साईभक्त बाथमॅटचा वापर करतील, त्यामुळे हॉल व पॅसेज ओला होऊन खराब होणार नाही. त्यासाठी प्रत्येक इमारतीमध्ये ८ असे एकुण ६ इमारतीमध्ये ४८ नग बाथमॅट लागतील. आर इमारतीच्या मेन गेटला २ व टॉयलेटचे ठिकाणी २ असे एकुण ४ नग काथा बाथमॅट असे एकुण ५२ नग बाथमॅट आवश्यक आहेत. रु.१७५/- स्केअर फुट प्रमाणे एका बाथमॅटची किमंत अंदाजे रक्कम रु.२,६२५/- इतकी होईल. त्यानुसार एकुण ५२ काथा बाथमॅटची अंदाजे रक्कम रुपये ५२ x २,६२५ = १,३६,५००/- (अक्षरी रू. एक लाख छतीस हजार पाचशे मात्र) इतका येईल.

तसेच सर्व इमारतीसमोरील मेनगेट जवळ हिरवे प्लॅस्टीक मॅट १० x २ फुट साईजच्या एकुण ६ मॅट लागतील. रु. १४०/- स्केअर फुट प्रमाणे एका हिरव्या प्लॅस्टीक मॅट साठी अंदाजे रूपये २,८००/- प्रमाणे ६ हिरव्या प्लॅस्टीक मॅटसाठी (६ x २,८००/-) = १६,८००/- (अक्षरी रू.सोळा हजार आठशे मात्र) इतका अंदाजे खर्च येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे दोन्ही मॅट खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. १,५३,३००/-(अक्षरी रु. एक लाख त्रेपन्न हजार तिनशे मात्र) चे खर्चाचे मान्यतेसाठी सादर. मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाले नंतर पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे काथा बाथमॅट/ हिरवे बाथमॅट (पायपुसणे) विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५३,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.१० साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंट्रोल, रोडेंट, फॉगिंग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी इत्यादी कामे आहे त्याच मंजुर दरात परंतु सर्व्हिस टॅक्स लागु करुन दि.०१.०४.२०१४ पासून तीन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन दर मंजुर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दि.१८/७/२०१३ पासुन सुरू करण्यात आला आहे. यामध्ये एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलीत कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरास देण्यात आलेली असून उर्वरीत पाच इमारतीमध्ये एकुण १६० हॉलमध्ये पालखी/ पदयात्रीतील सहभागी साईभक्तांसाठी निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.१००९ अन्वये साईधर्मशाळा विभागातील पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॅागिग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्यादीचे काम मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि.पुणे. यांचे दर मान्य करुन त्यांना जा.नं. एसएसएस/वशी-साईधर्मशाळा /२२९१/२०१३ दि.१५/०८/२०१३ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| ०६ इमारतीमधील हॉल, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण क्षेत्रफळ १,५७,९८२.३२ चौ. फुट<br><br>एका इमारतीचे क्षेत्रफळ | | इमारती संख्या | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता (वर्षातुन सहा फवारणी) इमारतीनिहाय वार्षिकक्ररक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे रु. ०.९० पैसे | एकुण रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|---|
| एका इमारतीसाठी | २६,२९१.८४ चौ.फुट | ०६ | २३,६६२.६५ | १,४१,९७५.९० |
| R- Block मधील स्वच्छतालय | २३२.३२ चौ.फुट | ०१ | २०९.०९ | २०९.०९ |
| | | | एकुण | १,४२,१८४.९९ |
| | | | पुर्णाकिंत रक्कम | १,४२,१८५.०० |

**ब) फॉंगिंग ट्रिटमेन्ट (धुरीकरण)**

| अ. नं. | विभाग | तपशील | धुरीकरणाचा दर(फॉगिंग ट्रिटमेंट) (प्रती फवारणी १५ दिवसासाठी एकक) ( महिन्यातुन २ फवारणी ) बारा महिन्यासाठी एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | साई धर्मशाळा (साईआश्रम-२) | फॉगिंग ट्रिटमेंट (मलेरीया, मच्छर,डेंगु मच्छर, चिकनगुनीया मच्छर इत्यादीसाठी ) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ.फुट | रु. २७५०/- प्रति फवारणी x ०२ फवारण्या x १२ महिने = रु. ६६,०००/- |
| | | एकुण रुपये- | ६६,०००/- |

टिप :- फॉंगिंग ट्रिटमेन्ट ( धुरीकरण ) आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येईल.

**क) डास आळी प्रतिबंधककऔषध फवारणी ( Anti Larval )**

| अ. नं. | विभाग | तपशील | डास,आळी प्रतिबंधकक्फवारणी दर ( ऑगष्ट-२०१३ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीसाठी ) (प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक ) ( महिन्यातुन २ फवारणी ) तीन महिन्यासांठी एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग - २ | डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) (ऑगष्ट २०१३ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ.फुट | रु. ९५० /-प्रति फवारणी x ०२ फवारण्या x०३ महीने = रु.. ५,७००/- |
| | | एकुण रुपये | ५,७००/- |

टिप:- डास आळी प्रतिबंधककऔषध फवारणी (Anti Larval) आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे | १,४२,१८५.०० |
| ब) | फॉंगिंग ट्रिटमेन्ट ( धुरीकरण ) | ६६,०००.०० |
| क) | डास अळी प्रतिबंधक औषध फवारणी | ५,७००.०० |
| | एकुण रुपये | २,१३,८८५.०० |

सदर कामी पार्टीने अटी/शर्ती मान्य असले बाबत दि.२६/०८/२०१३ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदर कामाचा कालावधी दि.३१/०७/२०१४ रोजी संपणार आहे. त्यामुळे पुढील पाच आर्थीक वर्षासाठी संबंधींत कॉन्ट्रक्टरने दि.१/०६/२०१४ रोजी खालील प्रमाणे अर्ज सादर केलेला आहे.

मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि.पुणे, यांनी सन २०१३-१४ साठी पेस्ट कंट्रोल कीटकनाशक फवारणी) साठी प्रती चौ.फुटाप्रमाणे दर दिलेले आहेत. त्याच मंजुर दरामध्ये दि.०१/०८/२०१४ पासुन ते पुढील पाच वर्षासाठी सदर कामकरण्यास आम्ही तयार आहोत. तसेच सदर पत्रात त्यांनी नमुद केले आहेकी , सन २०१३-१४ साठी जे वार्षिक दर दिले होते त्या दरामध्ये आमचे कडून सर्व्हिस टॅक्स लागु करणेचे प्रक्रिया झालेली नव्हती त्यामुळे आम्हास हा टॅक्स शासन दरबारी भरावा लागला. तरी या

कामासाठी आम्हास पुढील कालावधीच्या कार्यादेशामध्ये सेवाकर कर दर मंजुर करून सर्व्हिस टॅक्ससह दर खालीलप्रमाणे सादर केलेले असून कॉलम नं.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर मान्य करून आम्हास साईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी. अशी विनंती केलेली आहे.

१२.३६ % प्रमाणे सेवाकर सामाविष्ठ केले असता येणारे नविन दर कॉलम नंबर ५ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

| अं.न. | तपशिल | सन २०१३-१४ कालावधीतील दर रूपये/पैसे प्रती नग | शासन नियम नुसार कर सामाविष्ठ केल्यास होणारी वाढ रू.पै. | सर्व समावेशक सेवा १२.३६% आकरुन रू.पैसे. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | किटकनाशक फवारणी ६ इमारतीमधील हॉल, टॉयलेट, बाथरूम व स्टोअर रूम यांचे एकुण क्षेत्रफळ- १,५७,९८२.३२ | ०.९० पैसे | ०.११ पै | रु.१.०१ पैसे प्रति चौ.फुट | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता (वर्षातुन सहा फवारणी) वार्षीक रक्कम रु.१,५९,५६२/- |
| २ | फॉगिंग ट्रिटमेंट चारही बांजुचे क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ. फुट. | प्रति फवारणी रु.२७५०/- | रु. ३४०/- | प्रति फवारणी रु.३०९०/- | फॉगिंग ट्रिटमेंट करणेकामी (वर्षातुन २४ फवारणी) रक्कम रु.७४,१६०/- |
| ३ | (Anti Larval) चारही बाजुनी क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ.फुट. | प्रति फवारणी रु.९५०/- | रु.११७/- | प्रति फवारणी रु.१०६७/- | Anti Larval ऑगस्ट ते ऑक्टोबर (एकुण ६ फवारणी ) रु.६४०२/- |
| ४ | आर ब्लॉक मधील २३२.३२ चौ. फुट | ०.९० पैसे | ०.११ पैसे | रु.१.०१ पै.प्रति चौ.फुट | (वर्षातुन सहा फवारणी) वार्षिक रक्कम रु.१४१०/- |

सदर कंपनीने आहे त्याच दरामध्ये काम करण्यास तयार असल्याचे म्हटले असून, शासनाला भरण्यात येणारा सर्व्हिस टॅक्स (१२.३६%) आहे त्याच दरावर लागु होऊन त्या सह मान्य करुन कामाची संधी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

नियमाप्रमाणे ज्या कॉन्ट्रक्टरकडे सर्व्हिस टॅक्स नंबर असतो अशा कॉन्ट्रॅक्टरला सर्व्हिस टॅक्स वेगळा दिला जातो, परंतु दरपत्रक भरतांना सर्व्हिंग टॅक्स नमुद करणे आवश्यक आहे. संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांनी मागील वर्षाचे दर भरतांना सर्व्हिस टॅक्स नमुद केलेला नाही. असा देय होणारा सर्व्हिस टॅक्स रक्कम कॉन्ट्रॅक्टरला दिल्यानंतर ती सर्व्हिस टॅक्सची रक्कम शासनाला भरण्याची जबाबदारी संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांची असते.

तरी मे.जी.टी.पेस्ट कॅट्रोल प्रा.लि. पुणे यांचेकडे सर्व्हिस टॅक्स नंबर असून त्यांनी मागील वर्षी दर भरतांना सर्व्हिस टॅक्स नमूद न केल्या बाबतची चुक त्यांच्या लक्षात आली, तेव्हां त्यांनी त्यांचे अर्जात आहे तेच दर पुढील तीन वर्षासाठी देऊन फक्त शासनाला भरावयाचा सर्व्हिस टॅक्स १२.३६% ची मागणी केलेली आहे असे त्यांच्या अर्जावरुन दिसते.

सदर कंपनीची काम करण्याची पध्दत सेवाभावी असून काम समाधानकारक वेळेत व दर्जा राखुन काम करण्याची कुवत सदर कंपनीमध्ये आहे. प्रस्तुत वर्षामध्ये किटकांबाबत साईभक्तांनी तक्रारी केलेल्या नाहीत.

त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी मागील वर्षातील आहे त्याच दरामध्ये होणारा वार्षिक खर्च रु.२,१३,८८५ /-+ नव्याने या वर्षापासून देय होणारा सर्व्हिस टॅक्स रु. २६,४३६/- यासह एकूण रक्कम रु. २,४०,३२१/- खर्च अपेक्षित राहील. यामध्ये फक्त शासनामार्फत वेळोवेळी सर्व्हिस टॅक्स मध्ये जो बदल होईल त्याप्रमाणे सर्व्हिस टॅक्स या रक्कमेमध्ये कमी जास्त रक्कम होईल.

| अ.न. | तपशील | सन २०१४-१५ एकुण वर्षाचे दर | | शासन नियमा नुसार वर्षाला होणारी १२.३६ % सर्व्हिस टॅक्स रक्कम | | सर्व करासह एकूण वर्षाला होणारी रककम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | पै. | रुपये | पै. | रुपये | पै. |
| १ | किटकनाशक फवारणी पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता (वर्षातुन सहा फवारणी) प्रती चौरस फुटाप्रमाणे इमारतीनिहाय एकुण चौरस सर्व करासह रक्कम रु.१,५९,७५९/- | १,४२,१८५ | ०० | १७,५७४ | ०६ | १,५९,७५९ | ०६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | फॉगिग ट्रिटमेन्ट (मलेरीया, मच्छर, डेंगु मच्छर, चिकणगुण्या मच्छर इत्यादीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ. फुट. धुरीकरणाचा दर (फॉगिंग ट्रिटमेंट) (प्रति फवारणी १५ दिवसासाठी एक) (महिन्यातुन २ फावारणी) बारा महिन्यासाठी सर्व करासह एकूण रक्कम ७४,१५७/- | ६६,००० | ०० | ८,१५७ | ६० | ७४,१५७ | ६० |
| ३ | (Anti Larval) डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ.फुट (प्रति फवारणी १५ दिवसासाठी एक असे महिन्यातुन दोन फवारणी) तीन महिन्यासाठी एकूण रक्कम ६,४०४/- | ५,७०० | ०० | ७०४ | ६० | ६,४०४ | ६० |
| | एकूण | २,१३,८८५ | ०० | २६,४३६ | २६ | २,४०,३२१ | २६ |

पुर्णांकित रक्कम रुपये २,४०,३२१/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख चाळीसहजार तीनशे एकविस रु. मात्र)

दि.१५/०२/२०१४ चे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१६५ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील पेस्ट कंट्रोल,रोडेंट कंट्रोल ,फॉगिग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्त्यादी कामे मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि.पुणे यांना आहे त्याच मंजुर दरात १२.३६ % सर्व्हिस टॅक्स देण्यात येऊन पुढील तीन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी व त्यांचेबरोबरच्या करारनाम्याचे दरवर्षी नुतनीकरण करुन घेण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.४,२२,५२१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

साई धर्मशाळा या विभागासाठी पुढील पाच वर्षासाठी मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि.पुणे यांनी त्यांचे दि-०१/०६/२०१४ रोजीचे अर्जानुसार विनंती केलेली आहे. तथापी दि. १५/०२/२०१४ चे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मागील वर्षाच्या आहे त्याच मंजुर दरानुसार व या वर्षापासुन सर्व्हिस टॅक्ससह दरवर्षी कंपनी बरोबरच्या करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करुन सन २०१४-१५ या वर्षासह पुढील दोन वर्षासाठी असे एकुण तीन वर्षाकरीता मुदतवाढ देणे व या कामी येणारा खर्च २,१३,८८५/- व यावर १२.३६% ने संभाव्य सर्व्हिस टॅक्स रक्कम रु.२६,४३६/- सह एकुण रु.२,४०,३२१/- इतक्या खर्चासह संबंधीत कंपनी प्रतिनिधीला मा.त्रीसदस्य समितीपुढे चर्चा वाटाघाटी कामी बोलावून अंतिम निर्णय घेणे कामीचे मान्यतेसाठी सादर.

अथवा

२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षा साठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणे कामी सादर.

तरी १ व २ या मुद्यांवर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेणेकामीचे मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.५३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंट्रोल, रोडेंट, फॉगिंग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी इत्यादी कामे करुन घेणेसाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेत यावी, याकामी वर्तमानतपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.११ डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे छायाचित्र अल्बम देणगीदारांना भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ कुमार आण्णावरपु हैद्राबाद यांनी श्री साईबाबा समाधी स्थानाचे विविध छायाचित्रांचे मोठे अल्बम निर्माण करुन ते संस्थानला कोणत्याही प्रकारची देणगी पावती न करता भेट स्वरुपात दिलेले होते. सदरचे अल्बम श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी आलेल्या विविध मान्यवरांना भेट स्वरुपात देण्यात येतात.

पंरतु संस्थानकडे अद्यापपर्यत एकूण १३४ अल्बम शिल्लक आहेत. त्याकरीता सदरचे अल्बम २ लाखापेक्षा जास्त देणगी (रोख स्वरुपातील किंवा वस्तू स्वरुपातील) देणाऱ्या देणगीदार साईभक्तास भेट स्वरुपात द्यावेत असे मत आहे. सध्या देणगीदार साईभक्तास देणगी दिलेल्या दिवशी फक्त दर्शन/ आरतीची व्यवस्था केली जाते. किमान अशा मोठ्या देणगीदारांना सदरचे अल्बम भेट स्वरुपात दिल्यास त्यांना देणगी दिल्याचे समाधान वाटेल. सदर अल्बम भेट दिल्याची नोंद अल्बम नोंद रजिष्टरला (देणगी पावती क्रमांक/दिनांक, देणगीदाराचे नाव व पत्ता, देणगी रक्कम अशा स्वरुपात) ठेवता येईल .

अशा स्वरुपाची दिनांक १९.०५.२०१४ रोजीची टिपणी मंजुरीसाठी ठेवलेली होती, सदर टिपणीवर "मा. व्यवस्थापन समितीसमोर विचारासाठी प्रस्ताव ठेवावा"असे निर्देश झालेले आहेत.

तरी वरील बाबीवर व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा होवून निर्णय होण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला रु.५,००,०००/- मात्र किंवा त्यापेक्षा जास्त स्वरुपात देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांना डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे छायाचित्र अल्बम भेट म्हणून देण्यात यावेत व त्यांची नोंद ठेवणेत यावी.**

**तसेच, त्यापैकी १० अल्बम सोडतीद्वारे सर्वसामान्य साईभक्तांना देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१२ श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ कीर्तनकार व कलाकार निश्चित करणे, बिदागी निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ हा शुक्रवार दि.११/०७/२०१४ ते रविवार दि.१३/०७/२०१४ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रमः-** उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने कीर्तन कार्यक्रम होत असतात. मागील रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु.९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील ३ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कीर्तनकार नांव |
|---|---|
| १ | ह.भ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा<br>श्रीपाद दर्शन बिल्डींग नं.१, पहिला मजला,<br>लक्ष्मण रेषा बिल्डींग समोर, आयरे रोड, डोबिंवली पुर्व, जिल्हा-ठाणे<br>मो.नं.९७०२८५२२९० |
| २ | ह.भ.प.श्री.मंदार गंगाधर व्यास<br>श्रीपाद दर्शन नं.१, आयरे रोड, लक्ष्मण रेषा समोर,<br>डोंबिवली (पू ) जि.ठाणे .४२१ २०१<br>मो.नं. ९५९४२५६५७०, ८६५५८००३५६ |
| ३ | ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर<br>श्री.केशव कृपा कौस्तुभ मंगल कार्यालय, श्री संत दासगणु नगर, कारेगांव रोड,<br>परभणी -४३१ ४०९ मो.नं.९४२१९८३०५१ |

मागील उत्सवाप्रमाणे कीर्तनकारास रु.९००१/- (नऊ हजार एक मात्र) मानधन देणेबाबत व उपरोक्त पैकी कीर्तन कार्यक्रम कोणास द्यावा, या बाबतचा निर्णय त्रिसदस्यीय समितीचे सभेत घ्यावा लागेल.

**ब) कलाकार कार्यक्रमः** प्रत्येक उत्सवात तिन दिवस संगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान मार्फत करण्यात येत असते. गुरुपौर्णिमा-२०१४ चे उत्सवात खालील प्रमाणे ११ कलाकारांनी कार्यक्रम मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत. त्यांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | सुमीत पोंदा<br>साई निलायम, एच.सी.५०, लेक व्हयू<br>(एन आर आय) कॉलनी, खाँ-ए-फिजा.<br>भोपाल -४६२००१ (एमपी)<br>मो.नं. ०९४२५०००९८९ | श्री साई अमृत कथा | | विनामुल्य |
| २ | श्री.विजय साखरकर<br>दत्तनिवास चाळ नं.२/१, देवीपाडा,<br>मच्छिमार्केटसमोर, बोरिवली, मुंबई नं.६६<br>मो.नं.९८२०२१५८११, ९८२१३९३३२३ | साई-स्वर नृत्योत्सव<br>हिन्दी- मराठी साई गीतांवर<br>आधारीत नृत्यमय कार्यक्रम | १२ | विनामुल्य |
| ३ | वनिता बजाज<br>जी.एच.-८-१३६, पश्चिम विहार<br>नवी दिल्ली, मो.नं.९२१०४०४४९०,<br>९८१८८४६८३७ | साई भजनसंध्या कार्यक्रम | ८ | संस्थान देईल ती रक्कम घेण्यास तयार आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | कविता व्यवहारे<br>लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था,पुणे<br>साई सत्यम पार्क, लेन नं.३, लॉगींग हॉटेल मागे, पुणे नगर रोड, वाघोली<br>जि.पुणे ४१२ २०७<br>मो.नं.९७३००८०८६१ | आज की शाम साई के नाम | ४० | रु.५१,०००/ |
| ५ | पुनम खन्ना<br>रा.दिल्ली, साईसेवक<br>मो.नं.०९८१००३४८७२ | साईभजन संध्या | | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |
| ६ | प्रमोद शिवराम मोरे<br>कोहिनूर मित कंपाऊंड, बिल्डींग २ रुम.१२०, दुसरा मजला, ज्योतीबा महात्मा फुले मार्ग मुंबई, ४०० ०१४ (दादर- नायगांव)<br>मो.नं.९८२०४६०५६३ | मराठी, हिंदी, गुजराथी गाण्याचा कार्यक्रम | १५ ते २० | रु.८०,०००/- ते १०००००/- |
| ७ | कुसुमिता तिवारी/ योगेश तिवारी मुंबई<br>मो.नं.९८३३९८९१६८, ९८२१०१२६४८ | भजनसंध्या | २० | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |
| ८ | श्री.संजयकुमार जोशी,<br>परंपरा डान्स आणि मुझीक फोरम<br>३-४-१०१३/ ३/३/डी, राजेंद्र कॉलनी, बरकतपुरा, हैद्राबाद-५०० ०२७.<br>०९८४९३१६५२६ | कथक डान्स | | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |
| ९ | विद्वान एम.आर.हनुमंता राजू,<br>मृदंग आणि तबलीस्ट- श्री सरस्वती विद्या वृंद. नं.२८८, गार्गगेशश्वरी गाडीचौका, चामुडेश्वरी टॉकीज, मंडी मोहला, मैसूर. | साईभजन | | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |
| १० | निनाद अनिल शुक्ल<br>प्लॅट नं.१, साक्षी-१, इरा गॅस पेट्रोलपंपामागे, आनंदवल्ली, गंगापूर रोड, नाशिक-१३<br>मो.नं.९८२२५३२१७२, ९४२००८१२९२ | सांस्कृतिक कार्यक्रम | | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |
| ११ | आर.पी.कुमार<br>ईस्ट कॉस्ट रेल्वे क्लार्क, विशाखापट्टम.<br>मो.नं.०९९५१०५२२४८, ०९८६६२९१०१० | कुचीपुडी नृत्य | | मानधनाचा पत्रात उल्लेख नाही |

उत्सवाचे प्रत्येक दिवशी किमान एक कार्यक्रम या प्रमाणे तीन दिवशी किमान तीन कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे. कार्यक्रमाची वेळ सायं.७.३० ते रात्रौ १०.०० अशी राहील. त्यामध्ये कलाकारांचा सत्कारपण आहे. त्यासाठी आर्धा तास लागतो. प्रती दिवशी एक कार्यक्रम दोन तासाचा राहील. गुरुपौर्णिमा-२०१४ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी उपरोक्त पैकी कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करुन कार्यक्रमासाठी रुपरेषा ठरावता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ मध्ये ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन करणेसाठी ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर, परभणी यांची किर्तनकार म्हणून नेमणूक करणेत यावी व त्यासाठी त्यांना रु.९,००१/- मात्र बिदागी आदा करणेत यावी.**

**तसेच, सदर उत्सवामधील संस्थान आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकरांना प्राधान्य देण्यात यावे व विनामुल्य सेवा करणारे ०३ कलाकार निश्चित करण्याचे अधिकार मा.उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व मंदिर विभागप्रमुख यांना प्रदान करणेत आले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.१३ संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१४-१५ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासुन दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ (१) अन्वये, मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापिठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषांवर (on merit basis) भरण्यात येणाऱ्या (सुमारे ५० टक्के पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारित केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादित असावा, असा आहे. यास

अनुसरुन शासकीय/ शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रक्कमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.केजी ते इयत्ता १० वी (इंग्रजी माध्यम) व आय.टी.आय. या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराचे मर्यादेपर्यंत आदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै २००९ अन्वये, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी, सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना लागु आहे, त्याच धर्तीवर ती यापूढेही प्रचलित पध्दतीने चालू राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त शासन मंजुरीस अनुसरुन संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत संदर्भ क्र.३ चे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१७.०९.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६८८अन्वये सन २०१३-२०१४ चा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेसाठी रुपये-४५,००,०००/- (पंचेचाळीस लाख) खर्चास मान्यता दिलेली होती. त्यास अनुसरुन शैक्षणिक शुल्काच्या परताव्यासाठी एकुण रुपये ३८,४९,०२२/- प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

आता सन २०१४-२०१५ या वर्षाचा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकरीता बजेटमध्ये रु.५० लाख रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त शासन मंजुरीस अनुसरुन प्रचलित पध्दतीप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१४-२०१५ चा वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०६/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४ संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या पतीचे जागी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्रीमती भाग्यश्री अजय पांडे यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कै. (श्री.) अजय शिवराम पांडे, कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग यांचे संस्थान सेवेत असतांना दिनांक २४ एप्रिल, २०१४ रोजी पुणे येथील रुग्णालयात आजाराने दु:खद निधन झालेले आहे. कै. पांडे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर त्यांचे जागी नोकरी मिळणेबाबत त्यांच्या पत्नी श्रीमती भाग्यश्री अजय पांडे, पुणतांबा यांनी दि.२४ मे, २०१४ रोजी विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला आहे. या अर्जासोबत श्रीमती पांडे यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

०१. कै. अजय शिवराम पांडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र.

०२. कु.पावसे अर्चना सुभाष (सध्याचे नाव श्रीमती भाग्यश्री अजय पांडे) यांचा बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे न्यु इंग्लीश स्कूल, भेर्डापूर ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांचेकडील शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रानुसार जन्मतारीख ०६ एप्रिल, १९८० असलेबाबत.

०३. मा. तहसिलदार, राहाता यांचेसमोरील दिनांक २० मे, २०१४ रोजीचे कुमारी अर्चना सुभाष पावसे (लग्नापुर्वीचे नांव) व श्रीमती भाग्यश्री अजय पांडे या एकच व्यक्ती असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

०४. भारत सरकार आधार कार्ड क्र. ३०७५ २६८१ २०१४.

०५. निवडणूक आयोग ओळखपत्र क्र. LBH०६८३४४१.

०६. कु. पावसे अर्चना सुभाषराव यांची बी.ए. उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका.

०७. कु. पावसे अर्चना सुभाषराव मराठी, इंग्रजी, हिंदी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असल्याची प्रमाणपत्रे. <u>कै. पांडे यांचे संस्थान सेवेची माहिती खालील प्रमाणे :</u>

| | | |
|---|---|---|
| ०१. दिवंगत कर्मचाऱ्यचे पूर्ण नाव | : | अजय शिवराम पांडे |
| ०२. मृत्युचे वेळी असणारे पदनाम व विभाग | : | कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग. |
| ०३. वेतनश्रेणी | : | वेतनबँड ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० |
| ०४. संस्थानमधील कायम सेवेचा कालावधी | : | दि.०१/०७/२०११ ते दि.२४/०४/२०१४ |

एकूण सेवा २ वर्षे ०८ महिने २३ दिवस

०५. संस्थान सेवेत वेतनश्रेणीवर नियुक्ती होणेपुर्वी मानधन तत्वावर झालेली सेवा: ०४ वर्षे ०७ महिने

०६. मृत्यू दिनांक : २४/०४/२०१४

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१०००/प्र.क्र. २०/२०००, दि.२८/०३/२००१ तसेच सुधारीत शासन निर्णय क्र. अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४, दि.२२/०८/२००५ अन्वये शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. तसेच अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याच्या वारसाचे वय ४० वर्षाच्या आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते.

या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub- Rule (1) of Rule 6- "Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै. पांडे यांनी हयात असतांना दिनांक २३ जून, २०११ रोजी ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्रीमती भाग्यश्री अजय पांडे (पत्नी) यांची वारसदार (Nominee) म्हणून नेमणूक केलेली आहे. तसेच यापुर्वी शासन निर्णयानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या विविध निर्णयानुसार, संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत सामावुन घेणेत आलेले आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, श्रीमती भाग्यश्री अजय पांडे या संस्थानमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस पात्र आहेत, तथापि, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/ ४३३/ (३७/०९)-का.सोळा, दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर असून, सद्यःस्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर अंदाजे १२७६ इतके कर्मचारी काम करीत असलेने, सध्या वर्ग ४ चे अंदाजे ३७ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे. तसेच कै. पांडे यांचे कुंटूंबातील कोणताही सदस्य संस्थान सेवेत नाही.

उपरोक्त शासन निर्णय व अन्य बाबी तसेच कै. पांडे यांच्या पत्नी श्रीमती भाग्यश्री अजय पांडे यांचा लेखी अर्ज विचारात घेता, कै.अजय शिवराम पांडे यांचे जागेवर त्यांच्या पत्नी श्रीमती भाग्यश्री अजय पांडे यांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे अथवा त्यांची शैक्षणिक पात्रता (मराठी-इंग्रजी टंकलेखनासह पदवीधर असल्याचे) विचारात घेता संस्थानमधील इतर विभागात अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत सामावुन घेणेबाबतचे उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४० यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग-०४ ची पदे रिक्त नाहीत व ज्या वेळेस वर्ग-०४ ची पदे रिक्त होतील त्यावेळेस श्रीमती भाग्यश्री अजय पांडे यांना वर्ग-०४ या पदावर त्यांचे पतीचे बदली अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत सामावून घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५ वाहन क्र.एमएच- १७/ एजी- १०१६ चे अपघातबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वाहन क्रं.एमएच-१७/एजी-१०१६ चा वापर श्री साईबाबा हॉस्पिटलकडे कार्डीयाक रुग्णवाहीका म्हणुन करण्यात येत आहे. दि.२५/०१/२०१४ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल मधुन पेशंट पुढील उपचाराकरीता के ई एम हॉस्पिटल, मुंबई येथे सोडविणेकामी जातेवेळी सदर वाहनाचा प्रवासात पडघा गावानजीक अपघात झाला होता.

कार्डीयाक रुग्णवाहीका दुरुस्तीचे काम फोर्स मोटर्स कंपनीचे अधिकृत डिलर, अनुरोन इंटरप्राईजेस प्रा. लि., अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस व या कामी येणाऱ्या खर्चास वाहन विभाग कडील मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं.१५६९, दि.०३/०४/२०१४ रोजीचे टिपणीनुसार मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार, कार्डीयाक रुग्णवाहीका दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आलेले असुन दुरुस्ती कामाकरीता रु.७५,८०८/- मात्र खर्च झालेला असुन सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | बिल नं. / दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | अनुरोन इंटरप्राईजेस प्रा. लि., अहमदनगर | ४८१-२०/०५/२०१४ | २३,४०६.०० |
| ०२ | अनुरोन इंटरप्राईजेस प्रा. लि., अहमदनगर | ४८३-२०/०५/२०१४ | ४६,०००.०० |
| ०३ | अनुरोन इंटरप्राईजेस प्रा. लि., अहमदनगर | ४८२-२०/०५/२०१४ | ६,४०२.०० |
| | | एकुण रक्कम (रु.) | ७५,८०८.०० |

उपरोक्त प्रमाणे कार्डीयाक रुग्णवाहीका दुरुस्तीचे कामाकरीता एकुण रक्कम रु.७५,८०८/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याहत्तर हजार आठशे आठ) मात्र अदा करण्यात आलेली आहे.

तरी कार्डीयाक रुग्णवाहीकेचे दुरुस्ती कामाकरीता झालेल्या रु.७५,८०८/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याहत्तर हजार आठशे आठ) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६ नवीन पाच बसेस देणगी स्विकारलेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त, श्री.के.व्ही.रमणी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिरडी साई ट्रस्ट, साईनगर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता आयशर कंपनीच्या पाच बसेस देणगी दिलेल्या आहेत. सदर बसच्या किंमतीचा तपशिल खालील प्रमाणे.

| बसचा तपशिल | प्रति बसची किंमत | एकुण संख्या | एकुण किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| Volvo Eicher Skyline Minibus- 32 seater | Rs.13,30,000/- | 05 | Rs. 66,50,000/- |

उपरोक्त प्रमाणे साईभक्त, श्री.के.व्ही. रमणी यांनी देणगी दिलेल्या ०५ बसेस दि.२९/०५/२०१४ रोजी ताब्यात मिळालेल्या आहेत. देणगी पाच बसेसची एकुण किंमत रु.६६,५०,०००/- (अक्षरी सहासष्ठ लाख पन्नास हजार) मात्र असुन सदर बसेसचा वापर साईआश्रम भक्तनिवासस्थान येथून साईआश्रम धर्मशाळा व नवीन भक्तनिवास येथुन साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय ने-आण करणे कामी करावयाचा आहे.

तरी साईभक्त, श्री. के. व्ही. रमणी, याचेंकडून आयशर कंपनीच्या ०५ बसेस देणगी स्विकारले बाबतचा प्रस्ताव माहिती करीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ मंदिर परिसरामध्ये कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस नविन कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. यासाठी संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन अद्यावत सुरक्षा यंत्रणा विकसित केलेली आहे.

परंतु त्याच अनुशंगाने मंदिरातील विविध ठिकाणी कॅमेऱ्याची आवश्यकता आहे. या संदर्भात मंदिर विभाग प्रमुख यांचेशी चर्चा करण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील नविन कॅमेऱ्याची आवश्यकता आहे.

१) मंदिरातील गुरुस्तान कडील बाजु- १ नग
२) व्हि.आय.पी - - १ नग
३) मंदिर ऑफीस - - ३ नग
४) स्टोअर - १ नग
५) व्दारकामाई - - १ नग
६) फ्री लाडु प्रसाद - २ नग
७) संरक्षण विभाग - १ नग
८) गेट नं.२ - - १ नग
९) मंदिर क्लॉकरुम कॅबिन - १ नग
१०) मंदिर परीसर उदीप्रसाद काऊटंर - १ नग

या प्रमाणे साधारणता १३ कॅमेऱ्याची आवश्यकता आहे.

या कामी खालील प्रमाणे कॅमेरे व इतर अनुशंगीक साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. no | Specification | Brand | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Outdoor IP Camera<br>-Sony Super HAD II<br>- 2Mega Pixel camera<br>- distance - 30M<br>-network support -TCP/IP.HHTP,DHCP<br>-3 years onsite comprehensive warranty | SONY | 13 |
| 02 | NVR-<br>- 16 IP camera input,1BNC,HDMI<br>**- Display split -1,8,16**<br>**-2TB SATA HDD.**<br>**-DVD writer**<br>**-USB port,** | - | 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| | -Network support | | |
| 03. | All necessary conduct/PVC cabling for data & power for said project | - | As requirement |
| 04 | Installation & labour charges | - | One time |
| 05. | Tech support of one technician | - | 3 year ( warranty period) |

वरील सदरच्या कामासाठी एकंदरीत ३.७५ लाख + टॅक्स खर्च अपेक्षित आहे व टेक्निशियनसाठी दरमहा ११ हजार + टॅक्स हा वॉरंटी कालावधीत (पुढील ३६ महिण्यासाठी) खर्च करावा लागेल.

उपरोक्त प्रमाणे, मंदिर परीसरात १३ कॅमेरे बसविण्यासाठी एकत्रित रु.३.७५ लाख + टॅक्स व टेक्निशियनसाठी येणाऱ्या खर्चाच्या मान्यतेसाठी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.५४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंदिर परिसरामध्ये अत्यावश्यक ठिकाणी कॅमेरे बसविणेस तसेच याकामी येणाऱ्या एकत्रित रु.३.७५ लाख मात्र + टॅक्स व टेक्नीशियनसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल प्रमुख)

---

विषय नं.१८ **श्री साईबाबांच्या मुर्तीमागील दगडी कमानीस सोन्याचा लेप लावणेबाबत.**

प्रस्ताव- श्री मंगेश रमणलाल लोढा, शिर्डी यांचे दि.२८/०५/२०१४ रोजीचे पत्रामध्ये नमुद केले आहे की, मी एक साईभक्त असुन माझी व माझे कुटूंबियांची बऱ्याच दिवसांपासुन इच्छा आहे की इतर साईभक्तांप्रमाणे देणगी रुपाने काहीतरी दयावे. श्री साईबाबांच्या समाधी मंदिरातील मुर्तिच्या पाठीमागील दगडी कमान डावी व उजव्या कमानीतील खाच्यात मधील कमानीप्रमाणे सोन्याचा लेप बसविण्याची इच्छा आहे. तरी या कामाकरीता परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यामध्ये आतील भिंतीना सोन्याचे नक्षीकाम श्री रेड्डी, हैद्राबाद यांचे देणगीतून करण्यात आलेले आहे. त्यावेळी आवश्यकतेनुसार सर्व ठिकाणी सोने बसविण्यात आलेले आहे. त्यावेळी फक्त श्रींचे मुर्तीचे पाठीमागील बाजुस असलेल्या दगडी कमानीच्या खाच्यामध्ये सोन्याच्या पट्टया करुन बसविण्यात आल्या परंतु श्रींचे मुर्तीचे पाठीमागील दोन्ही दरवाज्यांचे वरील बाजूस/मुर्तीचे दक्षिण व उत्तर बाजूकडील दोन्ही बाजूस असलेल्या दरवाजांच्या वरील खाचेमध्ये सोन्याच्या पट्टया बसविण्यात आलेल्या नाहीत. सोन्याचे नक्षिकामाचे खाली असलेल्या काळया दगडी कमानिमुळे सोन्याचे नक्षिकाम अधिक आकर्षक तसेच उठावदार दिसत आहे. या दगडी कमानिंचे खाचेमध्ये सोन्याचा मुलामा दिल्यास सोन्याचा मुलामा त्यास एकरुप होणार नाही. सोन्याचे नक्षिकामाचे सौंदर्य कमी होईल. तरी श्री मंगेश रमणलाल लोढा, शिर्डी यांना श्रींचे गाभाऱ्यामधील सुवर्णकामा व्यतिरीक्त श्री साईबाबांना देणगी देण्याकरीता इतर पर्यायी विचार करावा असे कळविणेस मान्यता असावी ही विनंती. तसेच श्री रेड्डी यांनी सिंहासन व श्रींचे मुर्तीचे पाठीमागील सर्व भिंतीवर सोन्याचे काम केलेले आहे. त्यामध्ये इतरांचे काम करणे योग्य होणार नाही. तसेच सोन्याच्या पट्टया श्री बाबांचे मुर्तीचे वरील कमानीस सध्या बसविलेल्या आहेत. श्री लोढा हे सोन्याचा मुलामा देणार आहेत. तरी सदरचे काम श्री.लोढा यांचेकडून करुन घेऊ नये असे नम्र मत आहे. तसे त्यांना कळविता येईल. याप्रमाणे मंजूरी मिळणेस विनंती आहे. तरी याबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.५४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या मुर्तीमागील दगडी कमानीस सोन्याचा लेप लावणेबाबत, मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्य शिर्डी भेटी दरम्यान प्रत्यक्ष पहाणी करुन योग्य तो निर्णय घेतील, तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

विषय नं.१९ **साईप्रसाद निवासस्थान व जनसंपर्क कार्यालय येथे नवीन अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे अंतर्गत दुरध्वनी संपर्कासाठी शांतिनिवास इमारतीमध्ये सिमेन्स कंपनीचे दुरध्वनी एक्सेंज बसविण्यात आलेले आहे. यापुर्वी मंदिर परीसर विस्तारीकरणाचे वेळेस शांतिनिवास इमारतीपासून साईप्रसाद निवासस्थान (जुने प्रसादालया) पर्यंत ५० पेअरचीच दुरध्वनी केबल भुमिगत करुन टाकलेली असुन त्या केबलवरुन आतापर्यंत साईप्रसाद निवासस्थान कार्यालय, साईप्रसाद १ व २ इमारतीतील

मजल्यावरील मदतनीस स्टोअर, विद्युत विभाग जनरेटर रुम व पर्यवेक्षक कार्यालय, खरेदी व भांडार विभाग कार्यालये तसेच नविन व्हीआयपी रुम्स मदतनीस तसेच व्हीआयपी रुम नं.१ ते २२ आदी ठिकाणी ५० दुरध्वनी जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्र.१ चे टिपणी नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागाने साईप्रसाद नं.१ दुसरा माळा, साईप्रसाद नं.२ दुसरा माळा व साईप्रसाद नं.१ गादी स्टोअर विभागात असे एकुण ३ नविन अंतर्गत दुरध्वनी कनेक्शनची मागणी केलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ अन्वये मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी जनसंपर्क विभागांस आणखी दोन नविन अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

साईप्रसाद निवासस्थान परीसरात ५० पेअरच्या टेलीफोन केबलवर ५० दुरध्वनी नंबर चालु असल्यामुळे त्या परीसरात सध्या नविन नंबर देता येणे अशक्य आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय मागणी पुर्ण करणेसाठी शांतीनिवास इमारत टेलीफोन एक्स्चेंज ते साईप्रसाद इमारती पर्यंत अंडरग्राउंड नविन टेलीफोन केबल टाकणे अशक्य आहे. त्यासाठी शांतीनिवास इमारत टेलीफोन एक्स्चेंज ते साईप्रसाद इमारती पर्यंत २० पेअरची ओव्हर हेड आर्मड टेलीफोन केबल टाकल्यास दोन्हीही ठिकाणी दुरध्वनी कनेक्शन्स देता येईल. याबाबत मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी दि.१६/०६/२०१४ रोजी चर्चा झालेली असुन त्यांनी त्वरीत प्रस्ताव सादर करणेस सांगीतलेले आहे. त्यानुसार सदरील काम हे टेलीफोन ठेकेदार यांचेकडुन कोटेशन मागवून करुन घ्यावे लागणार आहे. त्याकरीता करावे लागणाऱ्या टेलीफोन कामाचा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-10-15 | Supplying & erecting Jelly filled armoured telephone Cable 20 pair with 0.5 mm dia.laid in provided trench as per specification No.WG-TW | 500 Mtr. | 170.10 | 85,050.00 |
| 02 | 1-11-13 | Supplying, erecting & commissining Junction box suitable for 20 pairs as per specification No. WG-TW | 01 Nos. | 728.70 | 728.70 |
| 03 | 1-11-31 | Supplying,installing,testing & commissioning approved type Push button telephone Instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner. | 05 Nos. | 700.35 | 3,501.75 |
| | | | **Total Amount :-Rs** | | **89,280.45** |

उपरोक्तप्रमाणे सदरचे काम बाहेरील ठेकेदाराकडुन कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.८९,२८०.४५ इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२० संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकरीता नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे खालीलप्रमाणे विविध ठिकाणी संबंधीतांचे मागणीनुसार ए.सी.बसविणे बाबत कळविण्यात आलेले आहेत. सद्या आपणाकडे आवश्यक असलेले ए.सी.उपलब्ध नाही. त्याकरीता पुढील तपशीलानुसार नविन स्प्लिट ए.सी.खरेदी करावे लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | ठिकाण | तपशील (स्प्लिट टाईप ए.सी. वॉल माऊंटेड ) | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **१.५ टनाचे स्प्लिट ए.सी.खरेदीचा तपशील :-** | | | | |
| ०१) | मा.प्रशासकीय अधिकारी, श्री.सुभाष नारायण गर्कल यांचे कार्यालय. | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०१ नग | रु.४०,०००/- | रु. ०, ४०,०००/- |
| ०२) | आरक्षण तथा प्रशासकीय कार्यालय (साईबाबा भक्तनिवासस्थान) | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०६नग | रु. ४०,०००/- | रु. २,४०,०००/- |
| ०३) | श्री साईबाबा हॉस्पीटल, अधिसेविका कार्यालय | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०१ नग | रु.४०,०००/- | रु. ०,४०,०००/- |
| ०४) | श्री साईबाबा हॉस्पीटल, ओपीडी नंबर-१५ (कार्डिओलॉजिस्ट) | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०१ नग | रु.४०,०००/- | रु. ०,४०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल, कॅथलॅब कन्सोल रुम. | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०२ नग | रु.४०,०००/- | रु. ०, ८०,०००/- |
| | | **एकुण :-** | **११ नग** | **रक्कम :-** | **रु. ४,४०,०००/-** |
| **ब)** | **२ टनाचे स्प्लिट ए.सी.खरेदीचा तपशील :-** | | | | |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल, सीटी स्कॅन चिलर रुम. | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- २ टन. | ०२ नग | रु.४५,०००/- | रु. ०,९०,०००/- |
| ०७) | श्री साईनाथ रुग्णालय, गायनिक ऑपरेशन थिएटर | व्होल्टास/ ब्लू स्टार मेक, क्षमता :- २ टन. | ०२ नग | रु.४५,०००/- | रु. ०, ९०,०००/- |
| | | **एकुण :-** | **०४ नग** | **रक्कम :-** | **रु. १,८०,०००/-** |
| | | | | | **एकुण रक्कम रुपये ६,२०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणी लागणारे १.५ टन ११ नग व २ टन ०४ नग असे एकुण १५ नग नविन स्प्लिट ए.सी. ई-निविदा मागवून खरेदी करावे लागणार आहे. त्याकामी अंदाजे रक्कम रुपये ६,२०,०००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस, या कामास व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेसाठी १.५ टन ११ नग व २ टन ०४ नग असे एकुण १५ नग नविन स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१ माहे जुलै, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे जुलै,२०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | स्टेट बँक ऑफ हेद्राबाद, शिर्डी | २/७/२०१४ | १३,१२,४६,९८५/- |
| ०२ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | २/७/२०१४ | १२,०३,०९,७३७/- |
| ०३ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १६/७/२०१४ | २१,८६,१६,६६४/- |
| ०४ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ३१/७/२०१४ | २६,३७,७९,७२७/- |
| ०५ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुलै २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | **८३,३९,५३,११३/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु.८३.३९ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपद्धतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिंग सेवा देतात. वैधानिक लेखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरून बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

| अ.नं. | बँकेचे नांव | अ.नं. | बँकेचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | आंध्र बँक, शिर्डी | ०२ | बँक ऑफ बरोडा, नासिक |
| ०३ | बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०४ | कॅनरा बँक, शिर्डी |
| ०५ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०६ | कॉर्पोरेशन बँक, शिर्डी |
| ०७ | देना बँक, शिर्डी | ०८ | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०९ | युको बँक, शिर्डी | १० | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ११ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १२ | विजया बँक, शिर्डी |
| १३ | इंडीयन बँक, शिर्डी | १४ | ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी |
| १५ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | | |

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ८३.३९ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.८३.३९ कोटी मात्रची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२२ आय.डी.बी.आय. बँकेत खाते उघडून त्यांच्या इतर बँकींग सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** IDBI बॅंकेने संस्थानला दिनांक ५ जून, २०१४ रोजी प्रस्ताव देवून त्यात नमूद केले आहे की, आमची बॅंक संस्थानला सर्व प्रकारच्या बैकींग सुविधा पुरवेल. त्यांचे सुविधा घेणेसाठी त्यांनी संस्थानला त्यांचे बॅंकेमध्ये बचत खाते उघडणेबाबत प्रस्तावात नमूद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २०(३) नुसार विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तु केवळ राष्ट्रीयीकृत बॅंकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनीक रोख्यांमध्ये गुंतवण्यात येतील.

अधिनियमातील तरतूदींनुसार संस्थानच्या सर्व ठेवी फक्त राष्ट्रीयीकृत बँक किंवा बॅकांमध्ये ठेवता येतील. यामुळे IDBI ही राष्ट्रीयीकृत बँक नसल्याने ती RBI च्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या यादीत येत नाही. त्यामुळे संस्थानला IDBI बॅंकेत बचत खाते उघडता येणार नाही. तसेच IDBI बॅंकेत संस्थानच्या कोणत्याही ठेवी ठेवता येणार नाहीत, असे संस्थान अधिनियमाप्रमाणे दिसून येत आहे.

IDBI बॅंकेने त्यांचे प्रस्तावासोबत RBI बॅंकेचे परिपत्रक १६३०/२१.०४.१५२/२००४-०५ दिनांक १५ एप्रिल, २००५ प्रमाणे पुढीलप्रमाणे नमूद केले आहे Considering its shareholding pattern, IDBI Ltd. my be considered as a Government-owned bank. In view of the assurance to the Parliament given on 8th December 2004 by the Finance Minister during the ssidcussion on the Repeal Bill, 2003 that the Government holding in IDBI Ltd. would always be above 51% IDBI Ltd. is categorized under a new sub-group Other Public Sector Banks.

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयातील १७ एप्रिल, २०१४ च्या परिपत्रकात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- Accordingly, it has been decided that IDBI Bank Ltd. my be treated on par with Nationlised Banks/ State Bank of India by State Governments/ Union Territories for all purposes including deposits/ bonds/ investments/ gurantees and all State Government Business.

उपरोक्त बाबींचा विचार करता संस्थानला IDBI बॅंकेंत बचत खाते उघडून तसेच तेथे गुंतवणूक ठेवणेबाबत महाराष्ट्र शासनाची परवानगीची आवश्यकता भासते. परंतु त्यांनी त्यांचे Payment Gateway व EDC मशीनव्दारे इतर बॅंकापेक्षा आकर्षक, सुरक्षित व तत्पर सेवा दिल्यास त्या HDFC बॅंकेप्रमाणे स्विकारणे शक्य होईल.

IDBI बॅंकेत बचत खाते उघडणे, त्याचप्रमाणे त्यांचे इतर बॅंकींग सेवा घ्याव्यात किंवा कसे? याबाबतच्या निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला सद्य:स्थितीमध्ये नवीन बचत खाते उघडणेची आवश्यकता नसल्यामुळे तुर्तास सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२३ संस्थानला प्राप्त होणाऱ्या (Precious Stones) मौल्यवान खडयांचे मुल्यांकनकार नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांकडून देणगी रुपाने संस्थानला मौल्यवान खडे प्राप्त होत असतात. वैधानिक लेखापरिक्षकांनी वेळोवेळी सूचित केल्याप्रमाणे तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/१२/२००४ च्या सभेतील निर्णय क्र. १४२ मौल्यवान खड्यांचे मुल्यांकन करणेकामी आयकर/ अबकारी विभागांकडून मान्यता असलेले तज्ञ मुल्यांकनकार नेमूणक किमान दोन सदस्यांच्या उपस्थितीत मुल्यांकन करुन घ्यावे असे ठरले आहे. त्यानुसार मे.हिरो कालरा जेम्स, पुणे आणि ए.बी. आडगांवकर, नासिक यांची तज्ञ मुल्यांकनकार म्हणून नेमूणक करण्यात आली होती. या दोघामध्ये मौल्यवान खड्यांचे तज्ञ मे.हिरो कालरा जेम्स, पुणे हे असल्याने त्यांचेकडे खडे तपासण्याची संपूर्ण उपकरणे उपलब्ध होती. त्यामुळे संस्थानने त्यांच्याशी चर्चा/ वाटाघाटी करुन त्यांचा आलेला प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक

१९/०९/२००९ च्या सभेतील निर्णय क्र.७३१ प्रमाणे मान्य करण्यात आला होता तो असा त्यांच्या मागणी त्यांना प्रत्येक खड्याला रुपये १००/- तपासणी फी देवून त्यांचेकडून खडे स्वच्छ करणे, पॉलीशिग, तपासणी, पॅकीग, फोटाग्राफी, मुल्यांकन, प्रमाणपत्रे व लिलावाच्या वेळची सर्व जबाबदारी इत्यादी कामासाठी फी ठरविण्यात आली होती.

मे. हिरो कालरा जेम्स, पुणे यांनी फेब्रुवारी २०१४ पर्यत काम केले आहे. संस्थानला प्राप्त होणाऱ्या मौल्यवान खड्यामध्ये बहुतेक वेळेस श्रींना अर्पन केलेले दागीने उदा. मुकुट, पादुका, हार, पेन्डंट इत्यादी यांना मोठ्या प्रमाणावर एकसारखी तसेच वेगवेगळ्या आकाराचे खडे लावलेली असतात, यांचे मुल्यांकन करतांना मे.हिरो कालरा हे प्रत्येक खड्यास रुपये १००/- प्रमाणे फी आकारु लागल्याने एका वस्तुंचे (दागीण्याचे) मुल्यांकन फी मोठ्या प्रमाणात होऊ लागली. शिवाय त्यांनी एप्रिल, २०१४ पासून सदर फी दुप्पट करण्याचे सूचविले आहे. शिवाय त्यांनी पुणे येथून त्यांचे साहित्य आणणेसाठी संस्थानची स्वतंत्र गाडीचीही मागणी करु लागले आहेत. मुल्यांकन झालेल्या खड्यांचे सर्टिफिकेटस् संस्थानला वेळेवर न देणे, संस्थानने मुल्यांकनासाठी बोलविल्यानंतर येण्यास टाळाटाळ करणे वगैरे कारणामुळे त्यांचेकडून संस्थानला मौल्यवान खड्यांचे मुल्यांकन करुन घेणे योग्य ठरत नाही. शिवाय एकच मुल्यांकनकार असणे हेही वैधानिक लेखापरिक्षकांनी सूचविल्याप्रमाणे योग्य ठरत नसल्यामुळे संस्थानने सन एप्रिल २०१४ पासून पुढे मुल्यांकन करणेसाठी नामांकित मुल्यांकनकार जे आयकर/ अबकारी विभागाकडून मान्यता असलेले तसेच सरकार मान्य प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व्यक्ती/ संस्था यांचेकडून मुल्यांकनाचे दरपत्रके मागविण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे:

(१) मे. हिरो कालरा जेम्स, पुणे यांच्या दराप्रमाणे त्यांनी पूर्वीच्या दरामध्ये दुपटीने वाढ करुन प्रती खड्यासाठी रुपये २००/- असे दर सांगीतले आहेत. शिवाय त्यांना उपकरणे आणणे व सोडणेसाठी संस्थानच्या गाडीची आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संस्थानमध्ये मुल्यांकन करतेवेळी रहाण्याची व जेवनाची सोय करण्यात यावी, असेही सांगीतले आहे.

(२) पानजेम टेस्टींग लॅबोरोटरी, पुणे ही संस्था डॉ जयश्री पनजीकर ह्या चालवत असून, त्या ISO ९००१ च्या मानाकिंत प्रमाणपात्र असून त्या आयकर व कस्टम ड्युटीच्या पॅनलवर काम करतात. त्यांनी प्रती खडा रुपये १००/- तसेच मोठ्या दागीण्यांसाठी संस्थान ठरवेल तो दर असे नमूद केले आहे. त्याचे फी वर त्यांनी सर्व्हीस टॅक्स अतिरीक्त द्यावा लागेल असे नमूद आहे. सर्व उपकरणे त्या स्वतः शिर्डी येथे येऊन मुल्यांकन करुन देणार आहेत.

(३) नरेश मेहता व प्रदीपकुमार जे.जव्हेरी, मुंबई हे दोन्ही स्वतंत्र सरकारमान्य मुल्यांकनकार आहेत. त्यांचे दोघांच्या दोन स्वतंत्र फर्म असून ते आयकर विभाग/ कस्टम तसेच इस्कॉन सारख्या मंदीरांचे खड्यांचे व दागीण्यांचे मुल्यांकन करत आहेत. त्यांनी एकत्रितपणे दिलेल्या दराप्रमाणे प्रती खडा रुपये ९०/- + त्यावर येणारा सर्व्हीस टॅक्स. सर्व प्रकारच्या दागीण्यांसाठी व खड्यांसाठी त्यांचा हाच दर राहील असे नमूद केले आहे. तपासणीसाठीची सर्व उपकरणे ते स्वःखचाने शिर्डी येथे येऊन मुल्यांकन करुन देणार आहेत. शिवाय मुल्यांकन सर्टिफिकेट व स्टेटमेंटवर दोघेही एकत्रितपणे स्वाक्षरी करुन देणार असल्याने सदर प्रस्ताव संस्थानच्या दृष्टीने उत्तम आहे. त्यांनी त्यांचे प्रस्तावमध्ये नमूद केले की, आम्ही साईभक्त असून, आम्ही श्री बाबांना सेवा देण्यासाठी हे काम स्विकारु त्याबद्दलची फी ही आमच्या दृष्टीने गौण आहे.

वरील तिन्हीही मुल्यांकनकारांचे प्रस्तावांचा विचार करता संस्थान उपयुक्त असा नरेश मेहता व प्रदिपकुमार जव्हेरी, मुंबई यांचा प्रस्ताव, फी चे दर, त्यांची सेवा शिवाय एकाच फीमध्ये दोन मुल्यांकनकार अशी असल्याने संस्थानला हा प्रस्ताव उपयुक्त आहे. परंतु मौल्यवान खडे व मोठे किंमतीचे दागीणे यांचे मुल्यांकन करणेसाठी संस्थानने एकाच संस्थेवर किंवा व्यक्तीवर अवलंबून न राहता संस्थानला अशा सेवा पुरविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्ती अगर संस्था कि ज्या आयकर विभाग, कस्टम विभाग यांच्य पॅनलवर आहेत अशा व्यक्ती संस्थानच्या अधिकृत पॅनलवर ठेवणे गरजेचे वाटते. ज्याच्या सेवा नियमित व उत्तम मिळतील अशा व्यक्ती अगर संस्था यांना मुल्यांकनासाठी पाचारण करुन त्यांना संस्थानने अधिकृत ठरविलेले फीचे दर, इतर नियम व अटी प्रमाणे काम करण्यास संधी द्यावी, असे वाटते.

मौल्यवान खड्यांचे मुल्यांकन करणेसाठी संस्थानमध्ये त्यांचे फी चे दर, नियम व अटी खालीलप्रमाणे ठरविण्यात याव्यात:

०१. संस्थानच्या पॅनोलवर आयकर विभाग, कस्टम विभाग यांच्या यादीमध्ये असलेले मुल्यांकनकारांची नेमणूक करण्यात यावी.

०२. मुल्यांकनकार हे सरकारमान्य प्रमाणपत्र धारक किंवा ISO ९००१ मानाकिंत असावेत.

०३. मुल्यांकनकारांना सदर कामाचा चांगला अनुभव असावा.

०४. मुल्यांकनकारांनी त्यांचे मुल्यांकनाचे सर्व उपकरणे/साहित्य स्वखर्चाने शिर्डी येथेच येऊन मुल्यांकन करावयाचे आहे.

०५. मुल्यांकनकारांना मुल्यांकनासाठी शिर्डी येथे आल्यावर त्यांची निवासाची व भोजनाची सोय संस्थानने करावी.

०६. मुल्यांकनकारांनी मुल्यांकनाचे खडे स्वच्छ करणे, पॉलीशिग, तपासणी, पॅकीग, फोटाग्राफी, मुल्यांकन, प्रमाणपत्रे व लिलावाच्या वेळची संस्थानला मदत करणे इत्यादी कामे त्यांना देण्यात येणाऱ्या फी मध्येच करावयाची आहेत.

०७. मुल्यांकनाची फी म्हणून त्यांना प्रती खडा रुपये ९०/- + सर्व्हीस टॅक्स व मौल्यवान दागीण्यांसाठी ०.५०% किंवा रुपये ५,०००/- या पैकी कमी असलेली रक्कम + सर्व्हीस टॅक्स देण्यात यावा.

०८. आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या झालेल्या बिलांमधून आवश्यकता भासल्यास अनामत रक्कम ठेवण्याचा अधिकार संस्थानला राहील.

०९. मुल्यांकनाबाबतीत काही कायदेशीर बाबी अगर वाद विवाद निर्माण झाल्यास तो निवारण्याची जबाबदारी सदर मुल्यांकनकारावर राहील.

१०. संस्थानने मुल्यांकनकारांना मुल्यांकनसाठी बोलाविल्यानंतर, त्यांनी शिर्डी येथे येऊन संस्थानला सेवा पुरवावयाच्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे यापुढे संस्थानला प्राप्त होणाऱ्या मौल्यवान खडे व मौल्यवान दागीणे यांचे मुल्यांकन व त्याअनुषंगाने करावयाचे कामकाजासाठी मुल्यांकन फी, नियम व अटी तसेच संस्थानच्या अधिकृत पॅनलवर वरील तिनही मुल्यांकनकारांना नेमून त्यांना संस्थानने ठरविलेल्या फीमध्ये काम करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला प्राप्त होणारे मौल्यवान खडे व मौल्यवान खडयांचे दागीने यांचे मुल्यांकन आणि त्याअनुषंगाने करावयाचे कामकाजासाठी मुल्यांकनकाराची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येऊन, आयकर/ अबकारी विभागाकडून मान्यता असलेले किंवा सरकार मान्य प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व्यक्ती/ संस्था यांचेकडून मुल्यांकनाची दरपत्रके मागविण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच, जाहिरातीकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२४ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफांच्या (Gold Valuer) नेमणूकीस मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी स्वरूपात येणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणी करणे, बाजारभावाप्रमाणे किंमत लावणे याकामी, सराफ (*Gold Valuer*) म्हणून श्री. कमलाकर हरीभाऊ खरोटे, मनमाड (शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार) तसेच श्री. गणेश दत्तात्रय नागरे, शिरडी यांची मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १८ जूलै,२०१२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ५७३ अन्वये श्री. गणेश नागरे, दि. ०१ ऑगस्ट, २०१२ ते ३१ जुलै, २०१४ व श्री. खरोटे दि. ०१ ऑक्टोबर, २०१२ ते ३० सप्टेंबर, २०१४ या कालावधीसाठी यांची मानद तत्वावर दरमहा रू. २,५००/- (दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर नेमणूकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि श्री.गणेश नागरे यांच्याकडे सोने-चांदी मुल्यांकनासाठी आवश्यक असणारा शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार परवाना नसल्याने सदर परवाना मिळणेकामी श्री. नागरे यांनी मा.मुख्य आयुक्त, प्राप्ती कर विभाग, पुणे यांचेकडे अर्ज केलेबाबत सदर कार्यालयाची पोहोच पावती संस्थानकडे सादर केलेली आहे. तरी संस्थानला दक्षिणापेटीद्वारे प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तुंच्या संख्येत तसेच लेखाशाखेत देणगीरुपाने दैनंदिन प्राप्त होणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तुंमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. समाधि मंदिर व परिसरातील दक्षिणापेटी मोजणीकामी श्री. गणेश नागरे स्वत: नियमित उपस्थित असतात. लेखा शाखेकडे आलेल्या सोने-चांदी वस्तुंचे मुल्यांकन श्री गणेश नागरे यांच्याकडून करुन घेण्यात येते. संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. गणेश नागरे यांना दि. ०१ ऑगस्ट, २०१४ पासुन आहे रू.५,०००/- (अक्षरी रूपये पाच हजार) मात्र मासिक मानधनावर पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ द्यावी असे नम्र मत आहे.

**ब)** तसेच श्री. कमलाकर खरोटे, मनमाड (शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार) यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१२ पासून दोन वर्ष कालावधीसाठी दरमहा रुपये २,५००/- (रुपये दोन हजार पाचशे) मात्र मासिक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. श्री. खरोटे यांची नेमणुकीची मुदत दि. ३० सप्टेबर, २०१४ पर्यंत आहे. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तुंच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. खरोटे यांची रु.५,०००/-(अक्षरी रूपये पाच हजार) मात्र मासिक मानधनावर दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१४ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त अ व ब प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदी कस लावून तपासणेकामी नेमणूक करणेत आलेल्या प्रस्तावित सराफांची (Gold Valuer) मुदत संपुष्टात येत असल्यामुळे संस्थानचे कामकाजात सातत्य रहाणेच्या दृष्टीने नवीन सराफांची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. सोने-चांदी कस लावून तपासणेकामी स्थानिक/ परिसरातील सरकार मान्य सोने-चांदी कस लावणेचे प्रमाणपत्रधारकांकडून विहीत पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येऊन त्यांचे मासिक मानधनाचे दर मागवून घेण्यात यावेत, असे ठरले.**

**तसेच, याकामी येणाऱ्या जाहिरातीच्या व अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२५** **सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता पूर्व लेखा परिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) तसेच इतर कामकाजासाठी सक्षम लेखापरिक्षण संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखेकडून अदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणे पूर्वी पूर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परिक्षण झाल्यास नजर चुकीने होणा-या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे शक्य होतात. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखा परिक्षक स्वत: हजर राहणार असल्यामुळे, वैधानिक लेखा परिक्षणातही त्यांची मदत होवून, वैधानिक लेखापरिक्षकांच्या आक्षेपांचे प्रमाणही काही प्रमाणात कमी होण्यास मदत होते. यासाठी संस्थान मधील सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासना अंतर्गत पुरेसा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून पूर्व लेखा परिक्षक (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Audit) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. संस्थानचे व्यवहार हे महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार होत आहेत हे पाहण्याची सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखा परिक्षकांवर देण्यात आली आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. २१ जून,२०१३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४८१ अन्वये खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विविध लेखापरिक्षण संस्थांची मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | तपशिल | लेखापरिक्षक संस्थांची नावे | मानधन | एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | संस्थान पूर्व लेखापरीक्षक | श्री.मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे | २,२०,०००/- + सेवाकर | **४,६०,०००/- + सेवाकर** |
| ०२ | संस्थान अंतर्गत लेखापरीक्षक | श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी | २,४०,०००/- + सेवाकर | |
| ०३ | रुग्णालय अंतर्गत लेखापरीक्षक | श्री.एस.एल.कुलकर्णी चार्टर्ड अकौटंटस कोपरगाव. | २,१०,०००/- + सेवाकर | **४,०५,०००/-+ सेवाकर** |
| ०४ | रुग्णालय पूर्व लेखापरीक्षक | श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर | १,९५,०००/- + सेवाकर | |
| ०५ | कर सल्लागार | श्री.शंकर अंदाणी चार्टर्ड अकौटंटस. अहमदनगर | १,७५,०००/- + सेवाकर | |
| ०६ | माहिती व सुविधा केंद्रासाठी | श्री अमोल दातार चार्टर्ड अकौटंटस. पुणे | ५०,०००/- + सेवाकर | |

आता श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी व श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर यांनी अनुक्रमे दि.२२.०५.२०१४ व दि.०६.०६.२०१३ पत्रान्वये आम्ही बऱ्याच वर्षापासुन लेखापरिक्षणाचे काम करीत असुन संस्थानच्या आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. परंतु लेखापरिक्षकाच्या फीमध्ये गेल्या दोन वर्षामध्ये कोणत्याही प्रकारे वाढ झालेली नाही. श्री. सुरेश डौले यांची भागीदारी लेखापरिक्षण संस्था मे.एस.एस.ए.ए.एम ॲन्ड कं. यांनी व श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंटस यांनी संस्थानचे पुर्व लेखापरिक्षणासाठी रुपये ४ लाख व अंतर्गत लेखापरिक्षणासाठी रुपये ५ लाख इतक्या फीची मागणी केलेली आहे.

तथापी मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.०८.०१.२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.३४ नुसार लेखापरिक्षण करणेसाठी विविध संस्था न ठेवता फक्त दोनच संस्था ठेवाव्यात जेणेकरुन त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे सोईचे होईल असे ठरले आहे. यानुसार संस्थानकडे सध्या कार्यरत असलेल्या लेखापरिक्षकांपैकी मे.एस.एस.ए.ए.एम. ॲण्ड कं., पुणे व श्री.व्ही.व्ही. कोठारी चार्टर्ड अकौंटंट, श्रीरामपुर या दोघांचेच प्रस्ताव संस्थानला प्राप्त झालेले आहेत. सन २०१४-१५ या कालावधीतील अंतर्गत व पुर्व लेखापरिक्षण करणेसाठी या दोन्ही फर्मला लेखापरिक्षणाचे कामकाज देता येईल. त्यांचे गेली तीन वर्षांपासुन मानधनामध्ये वाढ झाली नसल्याने त्यांनी चालू वर्षी वरीलप्रमाणे वाढीव मानधन देण्याची संस्थानला मागणी केली आहे.

संस्थानमध्ये अंतर्गत लेखापरिक्षण व पुर्व लेखापरिक्षण करण्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये पुढीलप्रमाणे नेमणुका करता येतील.

१) मे.एस.एस.ए.ए.एम. ॲण्ड कं., पुणे यांना संस्थानचे पुर्व लेखापरिक्षक व दोन्ही रुग्णालयाचे अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन सन २०१४-१५ करिता नेमणुक होऊन, त्यासाठी त्यांना दोन्ही लेखापरिक्षणाचे एकत्रित वार्षिक मानधन गेली तीन वर्ष वाढविले गेले नसल्याने त्यांना पुर्वीच्या मानधनात प्रत्येकी वार्षिक २० % प्रमाणे (प्रत्येक वर्षी DA व वार्षिक वाढ गृहीत धरुन) तीन वर्षाचे एकुण सध्याच्या मानधनात ६०% वाढ करुन सन २०१४-१५ साठी एकुण मानधन म्हणुन रु.७,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पन्नासहजार मात्र) व त्यावर सेवाकर असे देता येईल. त्यासाठी त्यांनी दोन्ही लेखापरिक्षणासाठी पुरेसे कर्मचारी उपलब्ध करावेत. त्यांनी दोन्ही लेखापरिक्षणाचा त्रैमासिक अहवाल मुख्यलेखाधिकारी यांचे मार्फत मा.कार्यकारी अधिकारी यांना नियमित सादर करण्यात यावा.

२) श्री.व्ही.व्ही. कोठारी, चार्टर्ड अकौंटंट, श्रीरामपुर यांना संस्थानचे अतर्गत लेखापरिक्षक व दोन्ही रुग्णालयांचे पुर्व लेखापरिक्षक म्हणुन सन २०१४-१५ करिता त्यांची नेमणुक होऊन, त्यासाठी त्यांना दोन्ही लेखापरिक्षणाचे एकत्रित वार्षिक मानधन गेली तीन वर्ष वाढविले गेले नसल्याने त्यांना पुर्वीच्या मानधनात प्रत्येकी वार्षिक २० % प्रमाणे (प्रत्येक वर्षी DA व वार्षिक वाढ गृहीत धरुन) तीन वर्षाचे एकुण सध्याच्या मानधनात ६०% वाढ करुन सन २०१४-१५ साठी एकुण मानधन म्हणुन रु.७,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) व त्यावर सेवाकर असे देता येईल. त्यासाठी त्यांनी दोन्ही लेखापरिक्षणासाठी पुरेसे कर्मचारी उपलब्ध करावेत. त्यांनी दोन्ही लेखापरिक्षणाचा त्रैमासिक अहवाल मुख्यलेखाधिकारी यांचे मार्फत मा.कार्यकारी अधिकारी यांना नियमित सादर करण्यात यावा.

त्याव्यतिरिक्त सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता उर्वरित लेखापरिक्षण कामकाजासाठी खालीलप्रमाणे लेखापरिक्षकांची नेमणुक करण्यात यावी.

**(अ)** सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी करविषयक सर्व कामकाजाचे लेखापरिक्षण करणेकामी श्री. शंकर अंदाणी, चार्टर्ड अकौंटंट, अहमदनगर यांची वार्षिक १,७५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) चे मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. श्री साईबाबा संस्थान मधील कायम कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागु केल्याने बहुतांशी कायम कर्मचारी हे आयकर (Income Tax) कक्षेमध्ये आलेले आहेत. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी श्री. शंकर अनदानी यांनी एक प्रतिनिधी पुर्ण वेळेसाठी शिर्डी येथे संस्थान कामकाजासाठी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच त्यांनी संस्थानच्या करविषयक कामकाजात सर्वतोपरीने मदत केलेली आहे. त्यांना पुढील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक मानधन रु.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख मात्र) देऊन नेमणुक करावी.

**(ब)** संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये चालणा-या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणेकामी उपरोक्त दोन्हीही संस्थेकडून लेखा परिक्षणाचे कामकाज केले जाते. परंतू वाढत्या कामकाजाचा व्याप लक्षात घेवून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता मुंबई कार्यालयासाठी तसेच संस्थानचे परकिय चलनाचे व्यवहार, या कामी गेल्या नऊ वर्षापासून परकिय चलनाच्या लेखापरिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले श्री.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अटीवर नेमणुक करण्यात आलेली आहे.यासाठी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती म्हणुन अंदाजे रू.२५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पंचवीस हजार मात्र) पर्यत खर्च अपेक्षित आहे. याच तत्त्वावर सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी त्यांची नेमणुक व्हावी.

**(क)** सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठीच्या संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्रांचे लेखापरिक्षक म्हणुन श्री अमोल दातार यांची रुपये ५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार मात्र) वार्षिक इतक्या मानधनावर नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी त्यानुसार संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्रांचे लेखापरिक्षण पुर्ण केले असुन, त्याबाबतचा लेखापरीक्षण अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी सो यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यांचीही सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी याच मानधनावर नेमणुक व्हावी.

**(ड)** दि०६.०३.२०१० रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.१४ निर्णय क्र. २८७ मधील निर्णयानुसार आयकरासाठी श्री. राहूल केळकर असाो. यांची दि.२७.०४.२०१३ चे मा.त्रिसदस्सीय समितीच्या सभेतील निर्णय क्र.४१६ अन्वये योग्य त्या फी/ मानधनावर सेवा घेण्यात येत आहेत. संस्थानचे वार्षिक विवरणपत्र तयार करुन ते वेळेत भरण्याचे कामकाज ते करीत आहेत. सन २०१४-१५ या वर्षासाठीही त्यांची सेवा योग्य त्या मानधनावर चालू ठेवावी. परंतु त्यांनी सदर कामकाज करण्यास असमर्थता दाखविल्यास हेच कामकाज इतर योग्य आयकर सल्लागाराकडुन वेळेत पुर्ण करुन घेऊन त्यांना योग्य ते मानधन देण्याबाबत मान्यता असावी.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षणाचे कामकाज करण्यासाठी वरील लेखापरिक्षकांची नेमणुक दि.०१ ऑगस्ट, २०१४ ते दि.३१ जुलै, २०१५ या कालावधीसाठी करण्यासाठी तसेच कर सल्लागार, माहिती व सुविधा केंद्राचे लेखापरिक्षक तसेच मुंबई कार्यालयाचे लेखापरिक्षक, परकीय चलनाचे लेखापरिक्षक व संस्थानचे वार्षिक विवरणपत्र भरण्याविषयीचे कामकाज करणारे सल्लागार यांची नियुक्ती होण्यासाठी व त्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेच्या प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे (परिच्छेद- अ,ब,क,ड) कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, संस्थान कामकाजासाठी पुर्व लेखापरिक्षक नेमणूकीसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करणेत येऊन, वार्षिक मानधनासह अर्जांची मागणी करणेत यावी व ही कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सध्या काम करत असलेले पूर्व लेखा परिक्षक (Pre Auditor) यांना आहे त्याच अटी/ शर्ती व मानधनावर मुदतवाढ देणेत यावी.**

**त्याचप्रमाणे संस्थानमधील अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम, अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत करुन घेण्यात यावे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने सदर विभागासास आवश्यक असणारे कर्मचारी (वरीष्ठ लेखापाल-०१, वरीष्ठ लिपीक-०२, लिपीक-टंकलेखक-०२, मदतनीस-०१) पुरविणेत येऊन, तो विभाग सक्षम करणेत यावा. तोपर्यंत सद्याचेच अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) यांचेकडून आहे त्याच अटी/ शर्ती व मानधनावर काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२६** **श्री साईचरित्र हिंदी किंवा प्रादेशिक भाषेतील चरित्र देणगी स्वरुपात स्विकार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन प.पु. श्री साईबाबांच्या लीलेचा व शिकवणुकीचा प्रचार-प्रसार करणेसाठी संस्थानमार्फत शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथील बुकस्टॉलवर श्री साईचरित्र १६ भाषेत व इतर पुस्तके/फोटो व आरती सीडी संस्थानव्दारे श्री साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करणेत आले आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णयानुसार चेन्नई, सिकंदराबाद व बंगलोर या ठिकाणी माहितीकेंद्र सुरु करण्यात आले आहेत. त्याठिकाणी संस्थान प्रकाशीत पुस्तके/फोटो व सीडीची विक्री करण्यात येते.

देशातील साईमंदिरे पुस्तकांची जास्त नगांची मागणी करुन संस्थानला डि.डि. अथवा रोख रक्कम भरुन प्रकाशने विभागाकडे पुस्तकांचे पार्सल इच्छीत पत्त्यावर पाठविणेकामी विनंती करतात. अशा प्रकारची जास्त नगांची मागणी उपलब्ध झालेस त्यांना पुस्तके पुरवठा वाहतुक कंपनी TCI XPS (ट्रान्सपोर्ट) शाखा सिन्नर यांचे माध्यमातुन देशात कोठेही घरपोहच सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णयानुसार रु.१०/- पेक्षा जास्त छापील किंमतीवर २०% सवलतीच्या दराने बुकस्टॉलमध्ये विक्री करण्यात येते.

वरील सर्व बाबींच्या विचार करता मागील दोन वर्षापासुन पुस्तके व इतर साहित्य विक्रीचा आलेख वाढता आहे. शिल्लक साठा संपलेनंतर नवीन पुस्तके पुर्नमुद्रणाकामी पुढील सर्व कार्यवाहीसाठी बराच वेळ खर्च होत असतो.

श्रीमती अनिता कटारीया, नवी दिल्ली यांचे दि.०४.०६.२०१४ चे पत्रात त्यांची स्वत:ची प्रिंटींग प्रेस असलेबाबत नमुद केले आहे. त्यांनी संस्थानला देणगी रुपाने श्री साईचरित्र वेगवेगळया भाषेत छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यांच्या प्राप्त पत्रानुसार त्यांनी १,११,१११ नग श्री साईचरित्र स्वत: छपाई करुन पोहच करणार आहे.

श्रीमती अनिता कटारिया, नवी दिल्ली यांना श्री साईचरित्र देणगीरुपाने संस्थानला प्राप्त होणेकामी खालील अटी/ शर्ती नमुन्याबरहुकूम छपाई करुन घेता येईल.

१) पुस्तके छपाईचे अंतिम प्रूफ तपासणी करुनच पुढील छपाईस सुरुवात करावी लागेल.
२) पुस्तके छपाईकामी पुस्तकांच्या आतील मजकुराच्या सीडी देण्यात येतील. छपाईकाम पुर्ण झालेनंतर संस्थानला सदर सीडी परत जमा करुन घ्याव्या लागतील.
३) पुस्तके छपाईकामी आतील मजकुरासाठी नामांकीत कंपनीचा ७० जीएसएम अे ग्रेड मॅपलिथो व्हाईट पेपर व आतील पानावर ४ फोटो छपाई करणे.
४) पुस्तकांवर अटी / शर्ती प्रमाणे आवृत्ती क्र., छपाई संख्या, देणगी मुल्य छपाई करणे.
५) संस्थान प्रकाशीत सर्व पुस्तके कॉपी राईट आहे. छपाईबाबत जी सख्या कळविण्यात येईल त्यापेक्षा जास्त पुस्तके छपाई करता येणार नाही. छापलेली सर्व पुस्तके स्वखर्चाने शिर्डी येथे पाठवावी, परस्पर दिल्ली किंवा अन्य ठिकाणी विक्री अथवा मोफत वितरण करता येणार नाही.
६) सदर अटी व शर्तीस अधीन राहाणेकामी लेखीसंमती पत्र करारनामा रु.१००/- चा स्टॅम्प पेपरवर तयार करता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयातील इ.५वी ते ७वी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थिनींना स्कुल बसच्या सुविधेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी या विद्यालयात इ.५वी ते १०वी या वर्गांमध्ये ७५० विद्यार्थिनी शिकत आहे. यापैकी ३६२ विद्यार्थिनी इ.५वी ते ७वी या वर्गामध्ये शिकत आहे.या सर्वच विद्यार्थिनी सध्यस्थितीला पायी चालत, रिक्षा किंवा सायकलने विद्यालयात येतात, काही पालक स्वतः विद्यार्थिनींची ने-आण करतात, विद्यालय नगर मनमाड हायवे लगत असल्याने खुप मोठया प्रमाणात वाहतूक व वर्दळ असल्याने या रस्त्यावर सतत छोटे मोठे अपघात होत असतात. यामुळे इ.५वी ते ७वी या लहान वर्गातील विद्यार्थिनींना रस्त्याने पायी अथवा सायकलने जाणे-येणे दिवसेंदिवस त्रासदायक, धोक्याचे ठरत आहे.

संस्थानच्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी स्कूल बसने विद्यालयात येतात. मात्र कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींना स्कूल बसची सुविधा उपलब्ध नाही. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी स्कूलबस सुविधेकरीता आकारल्या जाणा-या शुल्का इतके शुल्क भरण्यास, कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींचे (एकूण संख्याः- १४५) पालक तयार आहेत, असे पालकांकडून सांगण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयातील विद्यार्थिनींना स्कूल बसच्या सुविधेकरीता निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयातील किती विद्यार्थिनीं व कोणत्या ठिकाणावरुन येणार आहेत, त्यासाठी किती बस व बसचालक, मदतनीस आवश्यक आहेत, बसच्या कोण-कोणऱ्या रस्त्यावरुन किती फेऱ्या होणार आहेत, विद्यार्थिनींसाठी बस चालु केल्यास संस्थानवर किती आर्थिक बोजा पडणार आहे, याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा. तसेच यापुढे अपुर्ण प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत येऊ नयेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.२८ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून चालू शैक्षणिक वर्षाचे शुल्क आकारणी न करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रत्येकी दोन वर्ग तुकडया मंजूर आहेत. या प्रत्येक वर्ग तुकडीची प्रवेश क्षमता ८० आहे. सध्या ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांकडून पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येते. मुले- शैक्षणिक शुल्क रु.३३०/- व मुलीकडून- शुल्क आकारणी नाही.

शिर्डी ग्रामस्थांचे दि.२८/०६/२०१३ रोजीचे निवेदनात इ. ११ वी च्या तुकडीवाढ करणेबाबतचे शिर्डीतील मा.नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचेसह ग्रामस्थानी इ.११ वी विज्ञान करीता वर्ग तुकडी वाढविणेबाबतची मागणी केली होती. त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र. ५९८ नुसार इ.११ वी विज्ञान शाखेची नवीन (तिसरी ) तुकडी सुरु करण्याचे ठरले. त्यानुसार इ.११ वी विज्ञान शाखेची नवीन तुकडी सुरु करण्यात आलेली आहे. तथापी सदरहू सभेत नविन वाढीव तुकडीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्काबाबत पुढील सभेमध्ये निर्णय घेणेत येईल, असे ठरले होते. याबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. कनिष्ठ महाविद्यालयाकडून शैक्षणिक शुल्क आकारणी करणेविषयीचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी लेखाशाखा AO चर्चा करा? असे निर्देशित करण्यात आले होते.

**लेखाशाखा विभाग अभिप्राय-** आपले संस्थानचे घटनेमध्ये कलम १७ प्रमाणे खालील उद्दीष्टे नमुद केलेली आहे.

०१. शैक्षणिक संस्था उपलब्ध करणे.

०२. श्री साईबाबांचे शिकवणुकीप्रमाणे गरीब व होतकरु मुलांसाठी शिक्षण संस्था चालविणे.

०३. घटनेतील तरतुदीनुसार फी वाढ करणे हे सर्वस्वी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयावर अवलंबुन आहे.

०४. संस्थानकडे शैक्षणिक फंड प्रत्येक वर्षी जमा होतो. तसेच संस्थानकडे देणगीतून व शैक्षणिक फंडातून खर्च भागविला जातो.

०५. शैक्षणिक उद्दीष्टांवर खर्च होऊन तोटा होत आहे. परंतु सन २०१२-१३ मध्ये शिक्षण निधी रक्कम रु.६,२६,७७,१६६/- मात्र जमा असून प्रत्यक्षात शिक्षणासाठी खर्च रक्कम रु.५,१२,६५.५०६/- मात्र एवढा झालेला आहे.

| आर्थिक वर्ष | शैक्षणिक संस्था | उत्पन्न | खर्च | तफावत |
|---|---|---|---|---|
| **२०१०-११** | **आय.टी.आय** | ४४,७०,८४२.०० | २,६०,०९,३०२.०० | २,१५,३८,४६०.०० |
| | **इ.मि.स्कुल** | ५०,४८,९२०.०० | १,६३,९८,१४३.०० | १,१३,४९,२२३.०० |
| | **कन्या विद्या मंदिर** | ३,६४,२०६.०० | १,८५,३०,१९४.५० | १,८१,६५,९८८.५० |
| | | | **एकूण तफावत (अ)** | **५,१०,५३,६७१.५०** |
| **२०११-१२** | **आय.टी.आय** | ४५,४७,९३०.०० | २,१०,४८,७५०.०० | १,६५,००,८२०.०० |
| | **इ.मि.स्कुल** | ७५,२८,००७.०० | १,५२,९८,६९४.०० | ७७,७०,६८७.०० |
| | **कन्या विद्या मंदिर** | ५५,९४५.०० | ८५,०८,३४६.०० | ८४,५२,४०१.०० |
| | **ज्युनिअर कॉलेज** | २,४१,३५८.०० | १,१६,५२,५००.०० | १,१४,११,१४२.०० |
| | | | **एकूण तफावत (ब)** | **४,४१,३५,०५०.००** |
| **२०१२-१३** | **आय.टी.आय** | ४४,१९,११३.०० | २,३९,१९,६२१.०० | १,९५,००,५०८.०० |
| | **इ.मि.स्कुल** | ८५,१२,७५०.०० | १,७५,७३,९७४.०० | ९०,६१,२२४.०० |
| | **कन्या विद्या मंदिर** | १४,४००.०० | ९८,५८,३६८.०० | ९८,४३,९६८.०० |
| | **ज्युनिअर कॉलेज** | ३,६३,३८७.०० | १,३२,२३,१९३.०० | १,२८,५९,८०६.०० |
| | | | **एकूण तफावत (क)** | **५,१२,६५,५०६.००** |
| | | | **एकूण = अ + ब + क** | **१४,६४,५४,२२७.५०** |

लेखाशाखा विभागप्रमख यांनी झालेल्या चर्चेसंबधी शैक्षणिक शुल्काविषयी जा.नं.एसएसएस-वशी-लेखा /१० /२०१४ दि.१६/०५/२०१४ चे पत्रान्वये संस्थानमध्ये अखर्चित रक्कम ब-याच प्रमाणात शिल्लक असल्याने अशा परिस्थीत शैक्षणिक शुल्कात एकाएकी वाढ करणेऐवजी तूर्त सध्याचेच शैक्षणिक शुल्क आकारणे बाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे प्रस्तावित करावे असे सुचविले आहे.

मा.मुख्य लेखाधिकारी यांनी सुचविलेप्रमाणे संस्थानमध्ये अखर्चित रक्कम ब-याच प्रमाणात शिल्लक असल्याने अशा परिस्थीत शैक्षणिक शुल्कात एकाएकी वाढ करणेऐवजी तूर्त सध्याचेच शैक्षणिक शुल्क (मुलांसाठी रु.३३०/- व मुलींसाठी शुल्क नाही या प्रमाणे) आकारणी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या शैक्षणिक फंडामध्ये अखर्चित रक्कम बऱ्याच प्रमाणात शिल्लक असल्यामुळे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ करणेऐवजी तूर्त सध्याचेच शैक्षणिक शुल्क (मुलांसाठी रु.३३०/- व मुलींसाठी विनाशुल्क) आकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.२९ श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा नुतणीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दरवर्षी श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाच्या इमारती, फर्निचर, मशिनरी, इंक्युपमेंन्ट-इन्सटयुमेंन्ट इ. चल-अचल मालमत्ता, कॅश इन ड्रॉवर, कॅश इन सेफ, कॅश इन ट्रॅन्झीट व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार रुग्णालये कर्मचाऱ्यांचा समुह विमा राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडे तुलनात्मक प्रिमियम दर कार्यपध्दतीने उतरविण्यात येतो. मागील वर्षी न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा-श्रीरामपुर यांचेकडे रु.४,११,०००/- इतक्या प्रिमियम रकमेस दि.१० जुलै २०१३ ते दि.०९ जुलै २०१४ या कालावधीसाठी विमा उतरविण्यात आला होता, ही मुदत दि.०९ जुलै २०१४ रोजी पुर्ण होत आहे.

**(ब)** उपरोक्त अ मध्ये नमूद केल्यानुसार दि.१० जुलै २०१४ ते दि.०९ जुलै २०१५ कालावधी करीता मालमत्ता विमा उतरविणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे : -

| Sr. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 50.00 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.50 |
| 3 | Burglary & Housebreaking policy | 65.00 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.50 |
| 5 | Comprehensive Fire policy (Including STFI, Terrorism & Earthquake cover | 78.00 |
| 6 | Group Insurance under provisions of Workmen Compensation Act, 1923 | Approx 600 personnel |
| | Total | 194 Crores |

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडे आवश्यक माहिती दिली जाते व तुलनात्मक प्रिमियम दरानुसार विमा पॉलिसी नुतनीकरण केली जाते. त्यास अनुसरुन खालील राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना आवश्यक माहिती देऊन मा.त्रिसदस्य समितीच्या सभेपुढे समक्ष चर्चा वाटाघाटीस बोलावुन करुन विमा पॉलिसी नुतनीकरण करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये सविनय सादर.

१. दि न्यु इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपुर (राष्ट्रीयकृत)
२. ओरीएन्टल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर (राष्ट्रीयकृत)
३. नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगाव (राष्ट्रीयकृत)
४. युनायटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी (राष्ट्रीयकृत)

एकुण खर्चः- एकुण १९४ कोटी एकत्रित रकमेसाठी अंदाजे प्रिमियम खर्च साधारणतः रु.८,००,०००/- इतका खर्च येईल.

**निर्णय क्र.५५५** **श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्राप्त झालेले ०४ विमा कंपन्यांची बंद पाकिटे उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | नाव | दिलेला दर रु. |
|---|---|---|
| १ | दि न्यु इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपुर | ४,०९,७२५/- |
| २ | ओरीएन्टल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर | ४,२५,०००/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगाव | ४,१६,०००/- |
| ४ | युनायटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी | **३,९६,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.युनायटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचे वार्षिक रु.३,९६,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुढील वर्षासाठीचा कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा रुग्णालयासाठी आर्थिक वर्ष २०१४- १५ करीता (मंजुरी दि.२६.०७.२०१३) Consignment Basis वर लागणारे Stent/ Balloon/ Pacemaker इ. (Part-B) कन्झुमेबल मटेरीयल खरेदी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी दैनंदिन वापराकरिता आर्थिक वर्ष २०१४-२०१५ कालावधीसाठी लागणारी औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो मटेरीयल, सि.टी.स्कॅन व एमआरआय फिल्म्स, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.१६/०१/२०१३ चे परीपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाची आकडेवारी, अनुभव व शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश यामध्ये करण्यात येऊन एकूण रु.४८,६६,६४,२५२/- खर्चाचा प्रस्तावात सादर करण्यात आला होता. त्यास मा.व्य.स.सभा निर्णय क्र.५६४/ दि.२६/०७/२०१३ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि. २५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये मान्यता मिळाली आहे. त्यामध्ये विहित ई-टेंडर कार्यपद्धतीने व गठीत केलेल्या १) सरकारी सहाय्यक वकील श्री. पी. पी. मोरे, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ २) जिल्हा शल्क चिकित्सक, ३) जिल्हा आरोग्य अधिकारी, ४) वैद्यकीय संचालक-संस्थान रुग्णालये व ५) वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय या कमिटीद्वारे प्राप्त होणाऱ्या निविदांवर अंतिम निर्णय घेण्यास मान्यता मिळाली आहे. त्यास अनुसरुनः-

**(I)** विहित कार्यपद्धतीने खरेदी करणेकामी ई-निविदेची जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर व दैनिक सकाळ- पुणे, टाईम्स ऑफ इंडिया- मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, चंदीगढ या वर्तमानत्रात प्रसिद्ध

करण्यात यावी असे सुचविण्यात आले होते. त्यास अनुसरुन, वरील वर्तमानपत्रात खालील वेळापत्रकात नमुद केल्याप्रमाणे जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. याशिवाय, संस्थानला नियमित पुरवठा करणाऱ्या कंपन्या, अधिकृत विक्रेते यांना देखील ई-मेल/ दुरध्वनी द्वारे अवगत करण्यात आले होते.

| | |
|---|---|
| Publish Date : | 09/12/2013 to 30/12/2013 |
| Document Download & Sale Date : | 09/12/2013 to 30/12/2013 |
| Pre Bid Meeting Date :<br>Venue - Saibaba Hospital 10.00 a.m. | 16/12/2013 |
| Bid Submission Start Date (Online) : | 09/12/2013 |
| Closing of Commercial Bid (Online) : | 30/12/2013 |
| Last Date and Time for Submission of Tender (Technical Bid) : | 04/01/2014 up to 5.00 P.M. |
| Date of Opening of Technical Bid : | 06/01/2014 up to 5.00 P.M. |

उपरोक्त कार्यपद्धती अनुसार एकूण खरेदीपैकी Part A मधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी विहीत कार्यपध्दतीने एकूण ६६ पुरवठाधारकांना रु.३०,५२,८८,३५८/- इतक्या रकमेचे दि.१९/०३/२०१४ रोजी खरेदी आदेश देण्यात आले असून त्यास मा. व्य. स. चे निर्णय क्र. २५४/ दि.१५/०३/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे.

उर्वरित Part-B करिता ३० तांत्रीक निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे:-

| Sr. No. | Name of Supplier |
|---|---|
| 1 | Advance Technologies, Bhopal |
| 2 | Advanced Vascular Technologies, Thane (W). |
| 3 | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi. |
| 4 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 5 | Biorad Medisys Pvt. Ltd., Mumbai |
| 6 | Boston Scientific India Pvt. Ltd. Gurgaon |
| 7 | Critical Care Systems, Pune |
| 8 | Deepak Enterprises, Nashik |
| 9 | Edwards Lifesciences (India) Pvt. Ltd., Mumbai. |
| 10 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat |
| 11 | Human Touch Technologies, Pune |
| 12 | India Medtronic Pvt. Ltd., Pune |
| 13 | Inter Medics, Mumbai |
| 14 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Cordis Division) |
| 15 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune |
| 16 | Meril Life Sciences India Pvt Ltd., Mumbai |
| 17 | Neo Alliance Healthcare Technologies Pvt. Ltd., Mumbai |
| 18 | Relisys Medical Devices Ltd., Hyderabad A.P. |
| 19 | Sahajanand Medical Technologies Pvt. Ltd., Surat |
| 20 | Sai Medical Systems, Bhopal |
| 21 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai |
| 22 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune |
| 23 | Shivam Trading Company, Mumbai |
| 24 | Shree Pacetronix Ltd., Pithampur (MP.) |
| 25 | TTK Healthcare Ltd.,Mumbai |
| 26 | Unimark Remedies Ltd., Mumbai |
| 27 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 28 | Vasmed Technologies, New Delhi |
| 29 | Veritas Bioventions Pvt. Ltd., Vapi |
| 30 | Visionary Health Care, Ahmedabad |

(II) मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीचे सभेपुढे दि.२५/०१/२०१४ रोजीचे सभेत या निविदांवर चर्चा विचारविनिमय करण्यात आला. प्राप्त निविदाधारकांनी दिलेली कागदपत्रे पाहुन त्यावर सांगोपाग चर्चा करुन सर्वानुमते तांत्रीक निविदा पात्र ठरवण्यात आल्या तद्‌नंतर त्याच दिवशी सर्व पात्र निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा हया समितीपुढे उघडण्यात आल्या व सर्व निविदाधारकांना सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलवण्यात आले होते. तांत्रीक निविदा उघडल्यानंतर सर्व उपस्थित (२९) निविदाधारकांना समिती सभेपुढे समक्ष बोलवून त्यांना खालील प्रमाणे सुचना देऊन त्यांच्या कडून छापील पत्रावर सुट घेण्यात आली होती.

१) आपण सादर केलेल्या सर्व निविदा हया Qualified झालेल्या असून ऑनलाईन निविदा मध्ये जे काही दर दिलेले आहे, त्यामध्ये आपण जास्तीत सुट दिलेस आपणाद्वारे संस्थानचे धर्मदाय रुग्णालयातील उपचार घेण्याऱ्या रुग्णांना माफक दरात चांगल्या कंपनीचे साहित्य मिळू शकतील.

२) आजचे सभेत आपण जे काही दरात सुट देणार आहेत ते दर अंतिम असतील तथापी खरेदी समितीस जर असे वाटले की आपण दिलेले दर व बाजारातील दर यामध्ये खूपच तफावत आहे तर समिती संबंधीत निविदा धारकास विचारणा करील, किंवा सदर आयटमची निविदा देखील रद्द करण्याचे अधिकार समितीने राखून ठेवले आहे. आपली कोणतीही अट समितीस खरेदीबाबत निर्णय घेण्यास बंधनकारक नसेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

३) सर्व निविदा धारकांना आपणास जी काही सुट द्यावयाची आहे, त्यासाठी संस्थानकडून छापील फॉर्म दिला जाईल त्यामध्ये लेखी स्वरुपात आपण आपली सुट द्यावी.

४) वाढत्या महागाईचे दर, इंधनाचे वाढते भाव तसेच रुपयाचे अवमुल्यन इ. कारणे सांगून मंजूर दरापेक्षा जास्त दर मागता येणार नाही. तथापी शासनाने काही साहित्याचे दर कमी केले किंवा CGHS यांनी दरात अजून काही कमी केले तर त्याचा दर त्या प्रमाणात कमी करावा लागेल. अशा सुचना देण्यात आल्या.

**(III)** दि. २२/०३/२०१४ रोजी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती पुरवठादारांनी दिलेल्या दरात अजून सुट मिळणेकामी सर्व निविदाधारकांना बोलावण्यात आले होते. सदरचे सभेसाठी समितीचे पुढील सदस्य उपस्थित होते. १) ॲड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), २) श्री अप्पासाो. शिंदे - उपकार्यकारी अधिकारी, ३) डॉ. गोकुळ घोगरे - वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी. (सदस्य), ४) डॉ. अविनाश आहेर - जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी- अहमदनगर (सदस्य), ५) डॉ. प्रभाकर राव -प्र.वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी (सचिव) ६) डॉ. राजकुमार जराड- वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी. (सदस्य), ७) श्री.एस.पी.लंके- वित्त व्यवस्थापक रुग्णालये तथा मुख्यलेखाधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

या वेळी सर्व प्राप्त निविदाधारकांना समितीचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार एकुण २८ निविदाधारक सभेसाठी उपस्थित होते. त्यांचेकडुन फेर सुट पत्रे घेण्यात आली.

**(IV)** संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांनी केलेल्या शिफारशीनुसार Product ची निवड करुन खरेदी आदेश देण्यासाठी **दि.०३/०५/२०१४** रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभेस पुढील सदस्य उपस्थित होते.

१) ॲड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), २) डॉ. गोकुळ घोगरे - वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी. (सदस्य), ४) डॉ. एम. डी. भोर- जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी- अहमदनगर (सदस्य), ५) डॉ. प्रभाकर राव- वैद्यकीय संचालक, (सचिव) श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी. (दि.१५/०२/१४), ६) डॉ. संजय पठारे- वैद्यकीय अधिक्षक, श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी ७) श्री. एस. पी. लंके - वित्त व्यवस्थापक तथा मुख्य लेखाधिकारी.

यावेळी यामध्ये नवनियुक्त कार्डीयालॉजिस्ट डॉ. मनोहर शिंदे यांना बोलविण्यात आले होते. त्यांना असलेल्या खरेदीच्या अनुभवावरुन मिळालेल्या दरांपेक्षा तुलनात्मकदृष्टया मोठया प्रमाणावर दर कमी मिळू शकतील असे त्यांनी सुचविले व सभा दि.१०/०५/२०१४ रोजी घेण्याचे ठरले.

**(V)** दरम्यानच्या कालावधीत सर्व संबंधीत पुरवठाधारकांना ईमेलद्वारे कळविण्यात आले. डॉ. मनोहर शिंदे व वित्त व्यवस्थापक श्री लंके यांनी बाजार भावाप्रमाणे पुरवठादारांना कमीत कमी दर देणेबाबत आव्हान केले व **दि.१०/०५/२०१४** रोजी समितीची सभा साईनिवास अतिथी गृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. ॲड. श्री. पी. पी मोरे | :- | सरकारी सहाय्यक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष) |
| २. डॉ. गोकुळ घोगरे | :- | वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी (सदस्य) |
| ३. डॉ. अविनाश आहेर | :- | जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी, अहमदनगर (सदस्य) |
| ४. डॉ. प्रभाकर राव | :- | वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी (सचिव) |
| ५. डॉ. संजय पठारे | :- | वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी |
| ६. श्री. एस. पी. लंके | :- | वित्त व्यवस्थापक |
| ७. डॉ. एम. व्ही. शिंदे | :- | कार्डिओलॉजिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी (समितीचे निमंत्रणावरुन) |

आजचे सभेपुढे एकूण ३० निविदाधारकांपैकी २७ निविदाधारक उपस्थित होते. सर्व उपस्थित निविदाधारकांना दि.२२/०३/२०१४ चे सभेत दिलेल्या दरामध्ये अजुन जास्तीत जास्त सूट देणेबाबत कमिटीने सुचविले, DHS मध्ये केलेल्या करार पत्रांमध्ये असलेल्या दरांपेक्षा जादा दर देण्यात येणार नाहीत असे सांगण्यात आले. काही पुरवठादारांनी न्युनतम दर देण्यासाठी सुट/स्किम्स (फ्री नग संख्या, क्रेडीट नोट इ.) देण्यास अनुसरुन दर देऊ केले. त्यानंतरही काही पुरवठाधारकांनी स्कीममध्ये वापरणाऱ्या ड्रग कोटेड स्टेंट साठी वेगवेगळया स्कीम्स/ डिसकाऊंट देऊ केल्यामुळे ड्रग कोटेड स्टेंट संबंधित

पुरवठाधारकांना कमीत कमी दर देण्यासाठी अंतिम संधी देण्याचे ठरले. दि. ०७/०६/२०१४ रोजी संबंधितांना ईमेल द्वारे कळविण्यात आले. ई-मेल मिळालेबाबत दुरध्वनीवर पडताळणी करण्यात आली.

VI) एकूण १४ ड्रग कोटेड संबंधित पुरवठाधारकांना ई-मेल / दुरध्वनी संपर्क करण्यात आला होता. त्यास अनुसरुन दि.१०/०६/२०१४ रोजी एकूण ०५ पुरवठाधारक प्रत्यक्ष हजर राहिले व एकूण ०४ ईमेल प्राप्त झाल्या. सदर सभा साईनिवास येथे घेण्यात आली. या सभेत पुरवठादारांनी चर्चा/वाटाघाटी केल्या यामध्ये त्यांनी सुट/डिसकाऊंट/क्रेडिट नोट असे देऊ करुन अंतिम इफेक्टीव्ह रेट देऊ केले. अशा प्रकारे, चर्चा/वाटाघाटी करण्यात येऊन काही ठळक बाबींगृहीत धरता साधारणत: रु.६ कोटी पर्यंत आर्थिक फायदा होत असल्याचे दिसुन येते, थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे :-

| अ. नं | मटेरीयल | दि.२२.०३.१४ रोजीचे अंतीम दर | दि.१०.०५.२०१४ व १०/०६/२०१४ रोजी चे प्राप्त इफेक्टीव्ह दर | २०१३-१४ वर्षाची प्रत्यक्ष नग संख्या | कमी आलेले प्रती नग दर | साधारणतः आर्थिक फायदा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | BMS | ९,००० | ६,००० | ९९४ | ३,००० | २९,८२,००० |
| २ | DES | २३,५०० | ११,८८३ | ३,६२७ | ११,६१७ | ४,२१,३४,८५९ |
| ३ | Cardiac Valves | ५०,००० | ४४,८५० | ४८० | ५,१५० | २४,७२,००० |
| ४ | Pacemaker | ५३,००० | ४५,००० | ३०० | ८,००० | २४,००,००० |
| ५ | PTCA Balloon | ७,५०० | ४,५०० | १,९४१ | ३,००० | ५८,२३,००० |
| ६ | Xience V | ५०,००० | ४१,५०० | १६० | ८,५०० | १३,६०,००० |
| ७ | Xience Prime | ७०,००० | ५३,००० | १८२ | १७,००० | ३०,९४,००० |
| | | | | | | **६,०२,६५,८५९** |

**(VII)** अशा प्रकारे विहीत ई-निविदा कार्यपध्दतीने मिळालेले दर इतरत्र बाजारभावांशी तुलना करता समकक्ष/न्युनतम मिळण्यासाठी पुरवठादारांना वेळोवेळी चर्चा/वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले होते. न्युनतम दर देण्यासाठी काही पुरवठादारांनी वेगवेगळया स्वरुपात सुट, स्किम्स, अटी/शर्तीवर दर दिले. उपस्थित सदस्यांनी खरेदीसाठी इफेक्टिव दर न्युनतम मिळण्यासाठी आलेल्या प्रस्तावावर सांगोपांग चर्चा करुन खरेदी बाबत कोणते निकष लावावेत यावर चर्चा केली. ई-निविदा कार्यपध्दतीमधील अटींचे उल्लंघन न होता प्रॉडक्ट निवड करुन खालीलप्रमाणे निकष लावुन खरेदी करण्याबाबत शिफारस कमिटीने केली.

**१.** काही पुरवठादारांनी संस्थान व्यतिरीक्त इतर ठिकाणी वार्षिक दर दिलेले आहेत, त्यापेक्षा कमी दर देणे व्यवहार्य नसल्याने न्युनतम दर देण्यासाठी बिलींग रक्कमेतुन Credit Note/Discount/Free Schemes गृहित धरुन निव्वळ (Effective) दर देऊ केले आहेत. खरेदी आदेश व त्यासह त्याप्रमाणे स्टॅम्प अॅग्रीमेंट स्वतंत्र करुन त्याप्रमाणे खरेदी विभागाने बीले अदायगीसाठी सादर करणे आवश्यक आहे व वित्त विभागामार्फत त्याप्रमाणे लेखापुस्तकांमध्ये त्याच्या अचुक नोंदी करणे आवश्यक आहे.

**२.** ड्रग कोटेड स्टेंन्ट- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, संस्थान कर्मचारी व इतर समकक्ष योजनांकरिता

| Sr. No. | Name of DE Stent | Effective Rate | Certification | Priority |
|---|---|---|---|---|
| 1 | Release R | 11,000/- | DCGI+Platform CE Marked | L 1 |
| 2 | Genx Sync | 12,250/- | DCGI | L 2 |
| 3 | Supraflex/S-core | 12,400/- | DCGI+CE | L 3 |
| 4 | Nostrum | 12,400/- | DCGI | L 4 |
| 5 | Abluminus | 16,000/- | DCGI+CE | L 5 |

Note:- L1 = Lowest One,

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या दरानुसार L१ to L५ असे प्राधान्यक्रम देण्यात आलेले आहेत. निवडीबाबत (अ.क्र. १ ते ३) अभिप्राय खालीलप्रमाणे:-

a. Supraflex & Supraflex Core (Sahajanand Medical) :
   i. In addition to DCGI this stent has additional CE approval in Europe.
   ii. Marketed all over India and Europe.
   iii. Last year was used in our cath lab.
   iv. L3 prize tag in all stents group and L1 in CE mark group.

b. Genxsync (Advanced Vascular Technologies Thane (W)
   i. DCGI aprooved.
   ii. L2 prize tag in all stents group.
   iii. Last year was used in our cath lab.

c. Release R (Relisys Medical Devices Ltd Hyderabad)

i. All major corporate groups of Hospitals like Apollo/ Fortis/ Care and Major Central Govt hospitals like AIIHMS (All India Institute of Higher Medical Sciences)/ NIJAMS Hyderabad and Jayadeva Hospital Bangalore are extensively using this stent. Sri Satya Sai Instituite of Higher Medical sciences Puttapart and Whitefield Bangalore had only exclusively use this stent and has largest number of angioplasties as a single centre.

ii. Our one of cardiologist Dr. Manohar Shinde was associated with this hospital and had extensive experience of this stent without any single complaint.

iii. This company has ISO 13485/ DSIR (Department of scientific and Industrial Research)approved production unit and Research & Development unit in India. This is one of the two companies of India having R&D going on Bioabsorable stent.

iv. In addition to DCGI approval, platform of this stent has additional CE approval in Europe.

v. Their platform stent (Cobal +C) marketed all over India and Europe.

vi. Last year their platform stent was used in our cath lab.

vii. L1 prize tag in all stents group.

**३. ड्रग कोटेड स्टेंन्ट- रोखीने वैद्यकीय उपचार घेणाऱ्यांकरिता (Exclusively for paid patients and not for charity if any)**

| Sr. No. | Name of DE Stent | Rate Quoted | Effective Rate | Certification | Priority |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Xience-V | 45,000/- | 41,500/- (1 Balloon free on 2 Stents) | DCGI+ CE+ USFDA | L 1 |
| 2 | Xience Prime | 60,000/- | 53,000/- (1 Balloon free on 1 Stent) | DCGI+ CE+ USFDA | L 1 |
| 3 | Xience Xpedition | 75,000/- | 68,000/- (1 Balloon free on 1 Stent) | DCGI+CE + USFDA | L 1 |
| 4 | Absorb | 1,25,000/- | 1,25,000/- | DCGI+CE | L 1 |

Selected only one company products (Abbott) in view of prize advantage (L1) and which was reduced by around 35-40% per unit as compared to last year. In addition to prize reduction we had received complimentary Baloon worth Rs 7000/- per stent.

४. For Cardiac Devices and Pacemakers:

- Probably we could not get optimal lower prizes as company could not participate directly in case of Pacemakers and Cardiac devices (ASD/ PDA/ VSD).
- Pacemakers were selected on the basis of L1 prize basis in (DCGI+CE+USFDA) group as they have post sales service (Programming) available in all district places.

काही स्टेंट Consignment तत्वावर ठेवण्याऐवजी खरेदी केल्यास दर कमी करण्यास कंपन्या तयार होत्या तथापि, Consignment तत्वावर टेंडर असल्याने त्यातच जास्तीतजास्त दर कमी करुन घेण्यात येऊन Consignment तत्वाला प्राधान्य दिलेले आहे. तसेच वार्षिक वापर व साहित्याच्या किंमती यावर नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने खरेदी कमिटीने त्रैमासिक आढावा बैठक घेऊन नियंत्रण ठेवण्याची शिफारस केली आहे.

५. याव्यतिरीक्त होणाऱ्या लहान मोठ्या खरेदीसाठी रुग्णालयात प्राथमिक पातळीवर संबंधित विभागप्रमुख, खरेदी विभागप्रमुख, संबंधित तज्ञ डॉक्टर, कमर्शियल बाबींसाठी (जसे सर्व्हिस टॅक्स, कस्टम ड्युटी, व्हॅट/सेल्स टॅक्स, आयकर, पेमेंट टर्म, पुरवठादारांस आवश्यक असलेप्रमाणे लेखाविषयक नोंदी, स्किम व त्यामुळे मिळणारा इफेक्टिव खरेदी दर) यासाठी वित्त विभागाचा एक प्रतिनिधी व या कमिटीचे अध्यक्ष वैद्यकीय संचालक अशी किमान ५ अधिकाऱ्यांची कमिटी असावी. या कमिटीने वार्षिक खरेदीसाठी महत्वाची माहिती संकलीत करुन ठेवावी, म्हणजे उच्च प्रतीचे साहित्य तुलनात्मक दृष्ट्या न्युनतम दरात मिळण्यास मदत होईल अशी शिफारस कमिटी करत आहे.

**६.** या खरेदीमध्ये डॉ.मनोहर शिंदे कार्डीयालॉजिस्ट व श्री. साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची अत्यंत महत्वाची मदत झाली आहे. मा.त्रिसदस्य समितीने यांचा यथोचित सन्मान करावा अशी शिफारस कमिटीने केली आहे.

**७.** अशाप्रकारे आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी विहीत कार्यपध्दतीने केलेल्या खरेदीस अनुसरुन रुग्णालयात on Consignment Basis वर साहित्य खरेदी करण्यात यावे. सदर साहित्याचा वापर ठरविल्याप्रमाणे विशिष्ट प्रमाणात होण्यासाठी वैद्यकीय संचालक यांनी संबंधित कार्डीयालॉजिस्ट/ कार्डीयाक सर्जन/ संबंधित डॉक्टर्स् यांची वेळोवेळी माहिती घेऊन नियंत्रण ठेवावे.

अशाप्रकारे वार्षिक खरेदीसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने ॲड. श्री.पी.पी.मोरे सरकारी सहाय्यक वकील, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने ई-निविदा कार्यपध्दतीने प्राप्त झालेल्या निविदा विहीत कार्यपध्दतीने पुर्ण करुन वार्षिक खरेदीचा प्रस्ताव सादर केला आहे. सोबत निवड करण्यात आलेले प्रॉडक्ट व पुरवठादारांनी दिलेले अंतिम न्युनतम दर याचे विवरण जोडले आहे. तरी खरेदी कमिटीने केलेल्या शिफारशींस अनुसरुन आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी केलेल्या विहीत कार्यपध्दतीने Part B मधील Consignment basis वरील खरेदीस मान्यता मिळुन, सोबत जोडलेल्या विवरणाप्रमाणे निवड करण्यात आलेल्या पुरवठादारांना खरेदी आदेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यिय समितीच्या सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.५५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी आर्थिक वर्ष २०१४- १५ करीता Consignment Basis वर लागणारे Stent/ Balloon/ Pacemaker इ. (Part-B) कन्झुमेबल मटेरीयल खरेदी करणेसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने ॲड. श्री.पी.पी.मोरे सरकारी सहाय्यक वकील, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने ई-निविदा कार्यपध्दतीने निवड केलेले मटेरीयल, पुरवठाधारक, प्राधान्यक्रम व केलेल्या शिफारसीनुसार खरेदीस मान्यता देण्यात आली. यामधील प्राधान्यक्रम व निम्नतम दर खरेदी समितीने दिलेल्या विवरणाप्रमाणे अंमबजावणी करणेत यावी.**

**तसेच, उपरोक्त खरेदी समितीने केलेल्या कामाबद्दल मा.त्रिसदस्य समितीने विशेष समाधान व्यक्त केले व या खरेदी समितीचे अध्यक्ष, श्री.मोरे पी.पी. यांना रु.२१,०००/- मात्र मानधन व जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनीधींना प्रत्येकी रु.११,०००/- मात्र मानधन व वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, नवनियुक्त कार्डीऑलॉजीस्ट डॉ.मनोहर शिंदे व श्री.साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक- रुग्णालये, यांचा सन्मानपत्र देण्यात येऊन गौरव करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **श्री. राम सोमवंशी, पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांना संस्थान निवासस्थान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. राम सोमवंशी, पोलीस निरक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांनी आपले दि.०२/०६/२०१४ रोजीचे अर्जात, "आमची बदली शिर्डी पोलीस स्टेशन येथे झाल्याने आम्ही कर्तव्यावर रुजु झालो आहोत. आम्हाला निवासस्थानाची आवश्यकता असल्याने श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचे करवी ५०० रुम भक्तीनिवासच्या पाठीमागे अधिकारी निवासस्थान मिळणेस विनंती आहे." असे नमूद केलेले आहे.

श्री राम सोमवंशी यांची नियुक्ती पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन या पदावर झाल्याने, त्यांनी निवासासाठी संस्थान निवासस्थान मिळणेची विनंती केलेली आहे. श्री सोमवंशी यांची नियुक्ती श्री संपत ज्ञा. भोसले, पोलीस निरिक्षक यांचे जागी झालेली असून श्री भोसले यांची बदली शिर्डी पोलीस स्टेशन अंतर्गत वाहतूक  शाखा कडे झोलेली आहे. सध्या श्री. भासेले यांना संस्थानचे साईसहवास नं. ०१/०५ हे संस्थान निवासस्थान निवासासाठी देणेत आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील विषय नं.४० व निर्णय क्र.५९८ नुसार फक्त पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी, व तहसिलदार, राहाता यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावे. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानकडे जमा करुन घेण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन सध्या मा.व्यवस्थापन समितीचे व प्रशासकीय मान्यतेने शिर्डी पोलीस स्टेशनकडील खालील अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

| अ. नं. | अधिकारी / कर्मचारी | देण्यात आलेले निवासस्थान. |
|---|---|---|
| ०१ | श्री. विवेक पाटील, उपविभागीय अधिकारी | साईसहवास नं.०४/०४ |
| ०२ | श्री दत्तात्रय पुं.पवार, पोलीस निरिक्षक | साईसहवास नं.०३/०६ |

| | | |
|---|---|---|
| ०३ | श्री संपत ज्ञा.भोसले, पोलीस निरिक्षक | साईसहवास नं. ०१/०५ |
| ०४ | श्री निलेश ज.लहामगे, राज्यगुप्त अधिकारी | साईध्यान ०२/३७ |
| ०५ | श्री रमेश चंद्रभान बोरुडे, पोलीस कॉन्स्टेबल | साईध्यान ०२/४० |

श्री सोमवंशी यांनी मागणी केलेल्या ५०० रुम भक्त निवासस्थान पाठीमागील परिसरातील साईसहवास या इमारतीमध्ये साईसहवास ०२/०२ हे एकमेव २ B.H.K निवासस्थान रिक्त आहे. सध्या संस्थान आस्थापनेवर २२२० कर्मचारी काम करत आहेत. कर्मचाऱ्यांचे निवासासाठी एकूण ३४० कर्मचारी निवासस्थाने बांधलेली आहेत व निवासस्थान मिळणेकरीता आजअखेर सर्व श्रेणीतील एकूण २५० कर्मचारी प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे सदर निवासस्थाने कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देणेकामी अपुरी पडत आहेत.

सध्या शिरडी पोलीस स्टेशनकडील कर्मचाऱ्यांकरीता ०५ निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. जर दिवसेंदिवस शिरडी पोलीस स्टेशनकडे नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढणार असेल, तर प्रत्येकाला संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणे अशक्य होईल. संस्थान निवासस्थाने प्राधान्याने संस्थान कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सध्या संस्थानकडे निवासस्थानांची संख्या अपुरी असून निवासस्थाने उपलब्ध करुन देणे अथवा बदलून मिळणेकरीता संस्थान आस्थापनेवरील वैद्यकिय अधिकारी / वरीष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी प्रतिक्षेत आहेत.

तरी वर नमूद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९८ व उपरोक्त बाबी लक्षात घेता श्री. राम सोमवंशी, पोलीस निरिक्षक, तात्पुरते निवासासाठी संस्थान निवासस्थान, त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युत आकार संस्थानकडे जमा करुन घेणेचे अटीवर उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच, श्री.संपत ज्ञा. भोसले, पोलीस निरिक्षक यांची बदली शिर्डी पोलीस स्टेशन अंतर्गत वाहतूक शाखेकडे झालेली आहे व वाहतूक शाखेकडील अधिकाऱ्यास निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत व्यवस्थापन समितीचा आजतागायत कोणताही निर्णय झालेला नसल्यामुळे श्री.संपत भोसले यांना निवासासाठी दिलेले संस्थानचे साईसहवास नं. ०१/०५ हे निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ दैनंदिन मेंन्टनन्स वापराकरीता सन २०१४-१५ वार्षिक साहित्य खरेदीचे खर्चास मंजुरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ध्वनिक्षेपण विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीकरीता खालीलप्रमाणे दिलेले आहे.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | साईज | मेक / ब्रॅण्ड | सन २०१४-१५ साठी मागणी | अदाजे दर रूपये | अंदाजे एकुण खर्च रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ७ | ८ | ९ |
| ०१ | केसिंग पट्ट्या | ३० mm | मोदी/ प्रिशीजन | (२०० मिटर) १०० नग | प्रतिनग ४०/- | ४,०००/- |
| ०२ | रावल प्लग (ग्रिप) | ८x२५ mm | ग्रिप | २०० पुडे | ०६/- | १,२००/- |
| ०३ | स्क्रु | ३५x८ mm | GKW | ५० पुडे | ५०/- | २,५००/- |
| ०४ | स्क्रु | २५x८ mm | GKW | २५ पुडे | ४०/- | १,०००/- |
| ०५ | स्क्रु | ६०x८ mm | GKW | २० पुडे | ६०/- | १,२००/- |
| ०६ | स्क्रु | ७५x८ mm | GKW | १५ पुडे | ७५/- | १,१२५/- |
| ०७ | पी.व्ही.सी.बेंड | २५ mm | प्रिसींजन | १०० नग | ४०/- | ४,०००/- |
| ०८ | पी.व्ही.सी.टू वे जंक्शन | २५ mm | प्रिसींजन | ५० नग | १५/- | ७५०/- |
| ०९ | पी.व्ही.सी. जंक्शन थ्री वे | २५ mm | प्रिसींजन | ५० नग | २०/- | १,०००/- |
| १० | पी.व्ही.सी.वन वे जंक्शन | २५ mm | प्रिसींजन | १०० नग | २०/- | २,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | सॅडल | २५ mm | प्रिसींजन | (२० ग्रीस) २० बॉक्स | प्रति बॉक्स १००/- | २,०००/- |
| १२ | अनअर्माड केबल(कॉपर) थ्री कोअर | २.५Q mm | पॉलीकॅब | (९० मिटर बंडल)४ बंडल | प्रति बंडल ५,०००/- | २०,०००/- |
| १३ | अनअर्माड केबल(कॉपर) टू कोअर | १.५Q mm | पॉलीकॅब | १५ बंडल | ४,०००/- | ६०,०००/- |
| १४ | फेक्सीबल वायर टू कोअर | २३/३६ | पॉलिकॅब/ इतर | १५ बंडल | १,०००/- | १५,०००/- |
| १५ | पी.व्ही.सी.टेप बंडल | ९ मिटर | स्टील ग्रीप | २०० नग | १०/- | २,०००/- |
| १६ | नायलॉन टॉय | १०० mm | Laser/Other | २५ पॅकेट | ५०/- | १,२५०/- |
| १७ | नायलॉन टॉय | १५० mm | Laser/Other | ३५ पॅकेट | ६०/- | २,१००/- |
| १८ | नायलॉन टॉय | २०० mm | Laser/Other | २५ पॅकेट | ७०/- | १,७५०/- |
| १९ | नायलॉन टॉय | २५० mm | Laser/Other | २५ पॅकेट | १००/- | २,५००/- |
| २० | नायलॉन टॉय | ३०० mm | Laser/Other | १३ पॅकेट | १२५/- | १,६२५/- |
| २१ | मशिन स्क्रु | ३/१६ | Good Quality | २५ बॉक्स | ६०/- | १,५००/- |
| २२ | अँकर स्क्रु फासनर | ३/१० mm | Good Quality | १०० नग | २५/- | २,५००/- |
| २३ | SDS PLUS HAMMER DRIIL BIT | ५x११० mm | ETERNITY | ५० नग | ६०/- | ३,०००/- |
| २४ | जी.आय.सॅडल | १५ mm | Good Quality | १० बॉक्स | ३००/- | ३,०००/- |
| २५ | माईक केबल | --- | FALCON | ५ बंडल | ३,०००/- | १५,०००/- |
| २६ | आहुजा कं. डायफ्राय | AU 40XT/60XT | आहुजा कं. | ५० नग | १००/- | ५,०००/- |
| २७ | आहुजा कं. डायफ्राय | १५ वॅट | आहुजा कं. | ५० नग | १००/- | ५,०००/- |
| २८ | R-G-6 केबल | --- | पॉलिकॅब | (३०५ मिटरचा) ३ बंडल | प्रति बंडल ७,०००/- | २१,०००/- |
| २९ | टाटास्काय डिश रिमोट | --- | टाटास्काय कं. | २०० नग | २००/- | ४०,०००/- |
| ३० | मिनी डिव्ही कॅसेट | DVM 60 | सोनी कंपनी | १०० नग | १५०/- | १५,०००/- |
| ३१ | ऑप्टीकल नोड 45-860 MHZ | --- | CONTECH /Other | २० नग | ४,०००/- | ८०,०००/- |
| ३२ | डि.व्ही.डी. R | १२० min 4.7 GB | सोनी कंपनी | ५०० नग | २०/- | १०,०००/- |
| ३३ | सी.डी. R | ७०० MB | सोनी कंपनी | २०० नग | १५/- | ३,०००/- |
| ३४ | सिंगल कोअर वायर | १.५ sqr mm | पॉलिकॅब | १० बंडल | २,०००/- | २०,०००/- |
| ३५ | टिव्ही रिमोट (३२" LCD TV करीता) | --- | सोनी कंपनी | २० | ६००/- | १२,०००/- |
| ३६ | टाटास्काय सेटअप बॉक्स स्पिचींग अॅडप्टर | Out-put 12V-1.5 A | टाटास्काय | १० | ३००/- | ३,०००/- |
| | | | | | | **३,६६,०००/** |

**(अक्षरी रक्कम रूपये तीन लाख सहासष्ट हजार मात्र)**

तरी सन-२०१४ ते सन-२०१५ या वर्षाकरीता वरीलप्रमाणे ध्वनिक्षेपण विभागाला मटेरीयलची आवश्यकता असून येणाऱ्या मटेरीयल खरेदीच्या अंदाजे रक्कम रूपये ३,६६,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन लाख सहासष्ट हजार मात्र) खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१४ ते सन-२०१५ या वर्षाकरीता ध्वनिक्षेपण विभागासाठी आवश्यक असलेले प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३,६६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ दि.१६/०८/२०१४ ते दि.१५/०८/२०१५ अखेर अतिथी गृह येथिल टाटा स्काय ची कनेक्शन फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१७/०५/२००९ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२५ व निर्णय क्र.४८८ अन्वये मान्यता मिळाल्याने संस्थानच्या अतिथी गृहातील २५ रूममध्ये टाटा स्कायचे कनेक्शन घेण्यात आलेले आहे. मागील वर्षी टाटा स्काय रिचार्ज करीता भरलेल्या फी ची मुदत दि. १५/०८/२०१४ रोजी संपत असल्यामुळे पुढील दि. १६/०८/२०१४ ते दि. १५/०८/२०१५ या वर्षाकरीता सुप्रीम स्पोर्ट मिक्स पॅक रिचार्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे दर आहेत. साईनिवास अतिथी गृहातील २५ कनेक्शनचे प्रत्येकी ०४ कनेक्शन प्रमाणे ०६ ग्रुप व ०१ सिंगल कनेक्शनचा एक ग्रुप आहे.

| | | |
|---|---|---|
| ग्रुपच्या ०४ पैकी पहिल्या कनेक्शनसाठी दरमहा | रू. ३२० x ०१ | = ३२०/- |
| व उर्वरीत ०३ कनेक्शनसाठी दरमहा | रू. २०० x ०३ | = ६००/- |
| **एका ग्रुपसाठी दरमहा फी** | **एकूण रू.** | **= ९२०/-** |
| ०४ कनेक्शनच्या एका ग्रुपची दरमहा फी | रू. ९२० x ०६ ग्रुप | = ५,५२०/- |
| ०१ सिंगल कनेक्शनच्या ग्रुपची दरमहा फी | रू.३२० x ०१ | = ३२०/- |
| **दरमहा एकूण २५ कनेक्शनची फी** | **एकूण रू.** | **= ५,८४०/-** |

दरमहा एकूण २५ कनेक्शनची फी रू.= ५,८४०/- x ११ महिने = ६४,२४०/- रूपये आहे. ११ महिन्याची फी भरल्यानंतर ०१ महिना मोफत मिळतो. २५ कनेक्शनची वार्षीक फी रू.६४,२४०/- भरावी लागणार आहे.

वरीलप्रमाणे सन २०१४ ते सन २०१५ या वर्षासाठी रिचार्ज फी भरणेकामी रू. ६४,२४०/- मात्र इतका खर्च येत आहे. तरी दि. १६/०८/२०१४ ते दि. १५/०८/२०१५ अखेर टाटास्काय रिचार्ज करीता येणाऱ्या रू. ६४,२४०/- (अक्षरी रक्कम रूपये चौसष्ट हजार दोनशे चाळीस मात्र) रूपयेचे खर्चास व टाटास्कायचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर श्री रूपचंद भागचंद कासलीवाल,श्रीरामपुर यांना कोटेशन प्रमाणे रिचार्ज करण्याकरीता ऑर्डर देणेस मान्यतेकरीता सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीपुढे मंजुरी करीता ठेवणेस मान्यता मिळणेस विनंती. तसेच पुढील प्रत्येक वर्षी टाटास्काय कंपनीच्या दराप्रमाणे रिचार्ज फी भरण्याकरीता मान्यता मिळणेस विनंती. वरील रिचार्जेसचे दर टाटास्काय कंपनीचे आज रोजीचे असून कंपनीने रिचार्ज करतेवेळी दर बदलल्यास वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ शिर्डी निमगांव शिव हद्दीजवळील नाल्याची साफसफाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** कलम २१ (२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) अन्वये स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी :

परंतु, राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांनी मिळून

बनलेली एक छाननी समिती स्थापन करील; आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल:

परंतु आणखी असे की, छाननी समिती आपल्या सभांचे आयोजन करण्यासाठी व कामकाज पाहण्यासाठी, आणि, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी विनियम तयार करील तसेच संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जांची शिफारस करणसाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयाने, केवल आर, सेमलानी यांच्या प्रकरणामधील रिट विनंतीअर्ज क्र.२००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निदेश आणि मार्गदर्शक तत्त्वे यांना अनुरुप अशी, मार्गदर्शक तत्त्वे तयार करुन ती प्रकाशित करील."

**प्रस्तवना:-** शिर्डी शहरात प्रवेश करताना तसेच प्रसादालयाकडे जाताना- येताना सदर नाला हा प्रथम दर्शनी दिसतो सदर नाल्यामध्ये शिर्डी शहरातील सांडपाणी सोडलेले असल्याने नाल्यामध्ये घाण साचलेली असल्याने पाण्याची दुर्गंधी सुटलेली आहे. सदरहू दुर्गंधीचा त्रास हा साईभक्त व स्थानिक नागरीकांना सहन करावा लागत असल्यामुळे सदर नाल्याची साफसफाई संस्थानमार्फत त्वरीत करुन घ्यावी किंवा सदरहु कामांसाठी निधी मंजूर करण्यात यावा असे शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र. नप/टेक-८/२००९/२०१४ दि.२४/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्ताव:-** सदर नाला हा स्वच्छ राहण्यासाठी त्यामधील गाळ माती काढून मिळाल्यास शिर्डी नगरपंचायतीकडून सदर नाल्याच्या भिंतीवर चैननिंक जाळीचे काम पूर्ण करण्यात येईल. सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम विभागाच्या दरसुची नुसार तयार केलेले आहे. त्याकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Excavation of wet soils or slush by physical means including use of centrifugal pump for removal of water or by any other approved method disposing off stuff so removed as directed in the from of berms to a lead of 50 m and all lifts. | 1242 | Cu.m | 91/- | 1,13,022/- |
| 02 | Transportation of excavated wet soil or slush material including loading, Unloading transportation charges and spreading as directed by Engineer-in charges. | 1242 | Cu.m | 193.63 | 2,40,488.46 |
| | | **Total Amount** | | | **3,53,510.46** |
| | | **Say R/o Rs.** | | | **3,53,510/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील लक्ष्मीनगर नाल्यातील गाळ, माती काढणेकरणे करीता रु.३,५३,५१०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी देणबाबत अथवा सदरहु काम संस्थानमार्फत विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करुन घेणेबाबत मा.त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी निमगांव शिव हद्दीजवळील नाल्याची साफसफाई करणेचे काम संस्थानमार्फत विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५३,५१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **परिचारक/ परिचारीका यांच्या नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील विषय नं. ५ नुसार यापूर्वी परिचारक/ परिचारीका या पदासाठी प्रवर्गानुसार एकूण १७८ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सदरच्या मुलाखती ६७ पदे नेमण्यासाठी घेण्यात आल्या होत्या. उमेदवारांच्या प्रवर्गानुसार मुलाखत व प्रात्यक्षिक परिक्षेनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात आली होती. सदरच्या सभेत गुणवत्ता यादी मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयाकरीता सादर करण्यात आली होती. त्यावेळी मा. व्यवस्थापनाने निर्णय क्र. ६६६ नुसार खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे. [परिशिष्ट अ]

०१. श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील सर्व पदांची बिंदुनामावली तयार करुन विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून बिंदुनामावली तपासून घेणेत यावी व तो पर्यत परिचारक/परिचारीका या स्थायी पदावरअनुशेषाने नेमण्याची प्रक्रीया सध्या स्थगित करण्यात यावी.

०२. प्रवर्गनिहाय १८ उमेदवारांची निवड करण्यात आली. तसेच आवश्यकता भासल्यास मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारांमधून योग्य उमेदवारांची निवड करावी.

०३. ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक/ परिचारीकांपैकी ज्यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा उमेदवारांना मुदत वाढ देऊ नये. उर्वरित १९ उमेदवारांना मुदतवाढ देण्यात यावी.

०४. कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत घेण्यात येणाऱ्या परिचारक/ परिचारीका यांना प्रतिमहा रु. ११,०००/- वेतन देण्यात यावे.

सदरच्या निर्णयानुसार वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे. वरील प्रमाणे निवड केलेल्या उमेदवारांपैकी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या १५ व कंत्राटदारामार्फत्त कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ३२ असे एकुण ४७ परिचारक/ परिचारीका कंत्राटी व टेंमररी पध्दतीने कार्यरत आहेत. त्याबाबतची माहिती सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे. [परिशिष्ट ब]

मा. महाराष्ट्र शासनाचे मंजूर आकृतीबंधानुसार परिचारक/ परिचारीका यांची मंजूर स्थाी पदे २६० आहेत. सध्या १५५ परिचारक/ परिचारीका कार्यरत आहेत. याबाबतचा २०० बिंदू नामावलीनुसार तक्ता सोबत अवलोकनार्थ जोडलेला आहे. [परिशिष्ट क]

सध्या कंत्राटी व टेंपररी पध्दतीने कार्यरत असलेल्या उमेदवारांचे संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे विनंती अर्ज इकडील कार्यालयाकडे सारखे येत आहे. तसेच त्यांच्या मुलाखती झालेल्या आहेत.रुग्णालयांकडे परिचारक/ परिचारीका यांची पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत सदर पदांच्या नेमणूकीसाठी बिंदु नामावली तयार केलेली आहे. सदरची बिंदु नामावली संस्थानचे मागास वर्ग कक्ष [सामान्य प्रशासन विभाग] यांचेमार्फत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून तपासून घेता येईल. सदरची तपासणी झालेनंतर भरतीबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सादर करता येईल. कारण मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०२/०८/२०१३ रोजीच्या आदेशात असे म्हटले आहे की, याकामी सध्या परिचारक/ परिचारीका यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी. कायम नेमणूकीबाबत नंतर विचार करता येईल. [परिशिष्ट ड]

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ जादा वैद्यकीय बिलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव- व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६/०१/१९९९ २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रस्ताविकः-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु. १०,०००/- पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे.

**मागणी:-**

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या -शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ- श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले** | | | | | | |
| १ | डॉ. अजित कुमार तुकाराम वाघ<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- RMO | वडील | peritonial Dialysis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २०६२९.०० | २०६२९.०० |
| २ | श्री. गावडे रविंद्र बापू<br>विभाग- पाणीपुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडील | किडणी विकार | डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १६९२.०० | १६९२.०० |
| ३ | श्री. खरात सतिश रामभाऊ<br>विभाग- प्रशासन<br>हुद्दा- लिपीक टंकलेखक | मुलगी | सर्दी / खोकला इ. | डॉ.कुलकर्णी | श्री साईनाथ हॉस्पिटल | २२४.०० | २२४.०० |
| ४ | भावसार लिलाबाई रुपेश<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | पती | सर्दी / खोकला इ. | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २३१०.०० | २३१०.०० |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या-शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सुर्वे वैशाली वसंतराव<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | आई | ह्दयविकार / मधुमेह | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १६२२३.०० | १६२२३.०० |
| ६ | गवळी किशोर साहेबराव<br>विभाग - माहिती तंत्रज्ञान<br>हुद्दा -माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख | स्वतः / मुलगी | सर्दी / खोकला इ. | डॉ. साबळे / डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | १६४०.०० | १२४०.०० |
| ७ | संजय एम. पटनी<br>विभाग -संरक्षण<br>हुद्दा - आंरक्षण | स्वतः | मधुमेह | डॉ. वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५५३५.०० | ५५३५.०० |
| ८ | जाधव ज्योतीलाल भिका<br>विभाग - साईआश्रम<br>हुद्दा - स्टोअर कीपर | स्वतः | मधुमेह | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ५५४१.०० | ५५४१.०० |
| ९ | डॉ. कांबळे दादासाहेब लुमा<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - त्वचा रोग तज्ञ | स्वतः/ मुलगी / वडील | मधुमेह | डॉ. बी.बी. साबळे / डॉ. रचना साबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | ३८३६.०० | २८३८.०० |
| १० | बकरे सतीष गंगाधर<br>विभाग - बांधकाम<br>हुद्दा - वरिष्ठ लिपीक | पत्नी | Polyarthritis | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२१८९.०० | १२१८९.०० |
| ११ | कासार सतिश गोविंद<br>विभाग - सभा कामकाज<br>हुद्दा - वरिष्ठ लिपीक | स्वतः | मधुमेह | डॉ. वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ९८३.०० | ९८३.०० |
| १२ | कु. जयश्री प्रभाकर पगारे<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | आई | Colour Doppler Rt. Lower Uenous Limb | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १७५५.०० | १४५५.०० |
| १३ | सौ. सध्या विनायक जाधव<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | पती | मधुमेह | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८१९.०० | ८१९.०० |
| १४ | डॉ. सुरवसे संतोष<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- ज्यू. इंटेसेव्हिस्ट | स्वतः | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | २३१६६.०० | २३११६.०० |
| | | | | | **एकूण** | **९६५४२.००** | **९४७९४.००** |
| | **ब - संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | |
| १५ | सौ. आरती पांडुरंग गंजाळ<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - प्रयोगशाळा तंत्रज्ञ | स्वतः | G१ P१ L१ with pretersem Leaking PV | डॉ. बागडीया | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी | १५२१५.०० | १५२१५.०० |
| १६ | सौ. शेळके जयश्री शरद<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | वडील | Chronic Lymphocytic Lenukemia | डॉ. मेहरोत्रा | टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई / प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी | ३०३००.०० | ३०३००.०० |
| १७ | श्री रमेश रामभाऊ कुमावत<br>विभाग- प्रसादालय<br>हुद्दा- मदतनीस | पत्नी | Lower GI Bleeding | डॉ. गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १११४५.०० | १११४५.०० |
| १८ | श्री. थेटे बाबासाहेब काशिनाथ<br>विभाग- द्वारावती<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Myxoid Liposarcoma (Post Operative) | डॉ. किरण गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १५३००.०० | १५३००.०० |
| १९ | गायकवाड जयश्री अंबादास<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | स्वतः | CHR Active Hepatitis | डॉ. पोरवाल | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ९३८१८.०० | ६३३८४.०० |
| २० | डॉ. शिरसाट मनिषा लक्ष्मण<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- ज्यू. भूलतज्ञ | वडील | Sqhamolous Carcinoma | डॉ. राम नाईक | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ११९८६४.०० | ९५४२४.०० |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या-शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | कोते संजय गोपीनाथ<br>हुद्दा - मदतनीस<br>विभाग - कॅंटीन | वडील | KC DM with Acuts Febrile Illness | डॉ. इंगळे | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | ११३७६५.०० | ७९६९९.०० |
| | | | | | **एकूण** | **३९९४०७.००** | **३१०४६७.००** |
| | **क- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| २२ | श्री विलास बाबूराव कोते<br>विभाग- भक्त निवास<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: | Mengnome | डॉ. मेहरोत्रा | Wockhardt Hospital, Nashik | २५२४०१.०० | १९१५३३.०० |
| | | | | | **एकूण** | **२५२४०१.००** | **१९१५३३.००** |
| **ड- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| २३ | श्री अजिंक्य रामचंद्र गायकवाड<br>विभाग- कयाशाळा<br>हुद्दा - सहा. शिक्षक | मुलगा | Circumcision | डॉ. गजहास | गजहास हॉस्पिटल, औरंगाबाद | ११५६९३.०० | ११७०६.०० |
| २४ | सलोमी मनोहर शिंदे<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | वडील | RTA with Head Injury | Dr. Thakare | सार्थक हास्पिटल, नाशिक | २४०१९.०० | १८९११.०० |
| २५ | श्री गागरे सुरेश भिमाजी<br>विभाग- कॅंटीन<br>हुद्दा - मदतनीस | आई | IHD Chest Pain & Invelgal with woond Bleed | | जिवनदीप हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर सेंटर, अहमदनगर | १४४३२.०० | ११५४५.०० |
| | | | | | **एकुण** | **१५४१४४.००** | **४२१६२.००** |
| | | | | | **अ+ब+क+ड= एकुण** | **९०२४९४.००** | **६३८९५६.००** |

**संस्थान अधिनियम/ ठराव त्यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु. ६,३८,९५६/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** नियमावली प्रमाणे छाननी केली असून देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तक्त्यातील अ, ब, क व ड मधील संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील कॅन्टीनबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशास अधिन राहुन जा. नं. ६८५० दि.१८/०१/२०१४ अन्वये मे. एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिर्डी यांना श्री साईबाबा हॉस्पीटल परिसरातील कॅन्टीन १२ महिन्यांसाठी (माहे जानेवारी, २०१५ अखेर) भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात आलेली आहे. याकामी त्यांचेकडून करारनामा देखील करुन घेण्यात आलेला आहे. परंतु, दरम्यानचे काळात रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक, कर्मचारी यांना माफक दरात चहा, कॉफी, दुध उपलब्ध व्हावे यासाठी संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत सदरच्या सोई उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. याचे निमित्त करुन मे. एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिरडी (कॅन्टीन कंत्राटदार) यांनी मा. सिव्हील जज्ज सो., सिनिअर डिव्हीजन, कोपरगाव यांचे समोर रे.मु. नं. १३६/२०१४ दाखल करुन संस्थान कॅन्टीन विरोधात मनाई हुकुमाची मागणी केली होती. दि.२३/०६/२०१४ रोजी मा. न्यायालयाने वादीचा मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळलेला आहे.

एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिरडी यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार भाडे कमी करुन व ते त्यांना मान्य नसल्यास एक महिना पूर्व नोटीस देण्यात येऊन कॅन्टीन खाली करुन घेण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन दि.२४/०५/२०१४ रोजी कॅन्टीन कंत्राटदारास एक महिनापूर्व नोटीस पाठविलेली आहे. त्याची मुदत आता संपलेली आहे. तसेच मा.न्यायालयाने मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळलेला आहे. त्यावर वादीने वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीत संस्थान सदरच्या कॅन्टीनचा ताबा आजही घेऊ शकतो. परंतु कॅन्टीन कंत्राटदार यांनी आज दि.२६/०६/२०१४ रोजी कॅन्टीन खाली करणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. त्यात

त्यांनी असे म्हटले आहे की, मी आपल्या पत्राप्रमाणे व मागणीप्रमाणे कॅन्टीन खाली करुन देण्यास तयार आहे. परंतु मला याकामी चार दिवसांची म्हणजेच दि.३०/०६/२०१४ अखेर मुदतवाढ मिळावी.

तरी कॅन्टीन कंत्राटदाराचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील कॅन्टीन कंत्राटदार मे.एन.पी. डिस्ट्रीब्यूटर्स, शिरडी यांना सदरहू कॅन्टीन खाली करणेसाठी दि.३०.०६.२०१४ (चार दिवस) अखेर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.५६४ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी ठेवण्यात येणारे विषय (कापड कोठी लिलाव विक्री, वैद्यकिय आर्थिक अनुदान मागणी अर्ज, वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलती, अपोलो मेडीकल स्टोअर्स यांचे उत्पन्न, दर्शन रांगेतील भक्तांना वाटप केलेल्या मोफत लाडू प्रसाद, ठेकेदारी कर्मचारी संख्या व पाणी तपासणी अहवाल इ.) प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाच्या शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा.

तसेच जमाखर्च तक्ता, बांधकाम प्रगती अहवाल प्रतिमहा व पाणी तपासणी अहवाल (पाणी पिण्यायोग्य नसेल तर) मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ वैद्यकिय संचालक/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन/ प्र.कामगार अधिकारी/ पाणी पुरवठा विभागप्रमुख/ सर्व प्रशासकीय अधिकारी)

---

वरील निर्णय क्र. ५२७ ते ५६४ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | प्रमुख जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी